cmyk

## संपादकीय

### ‘नीट’च्या पेपरफुटीने विश्वासार्हतेला तडा

डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा जाणारा गैरप्रकार पहिल्यांदाच देशभर गाजत आहे. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. यावर्षी झालेली नीट यूजी परीक्षा रद्द करण्यात यावी आणि पुनर्परीक्षा घेण्यात यावी, या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली. सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकालानंतरच्या प्रक्रियेला तूर्तास स्थगिती देण्यास नकार दिला असला तरी, परीक्षा आयोजित करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) या संस्थेला जाब विचारला आहे.


दैनिक **राज्य लोकतंत्र**

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–६३ | गुरूवार दि.१३ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये


## आधार अपडेटला उरले दोन दिवस

नवी दिल्ली : आधार कार्ड अपडेट करण्यासाठी फक्त दोन दिवस राहिले आहेत. सुरक्षेच्या कारणास्तव सरकारने १० वर्षे जुने आधार कार्ड अपडेट करण्याच्या सूचना दिल्या आहेत. आधार कार्डचा गैरवापर होऊ नये म्हणून सरकारने हे आवाहन केले आहे. आता जर तुम्हाला आधार कार्ड अपडेट करायचे असेल तर तुम्ही ते मोफत घरी बसल्या करु शकता. पण यासाठी आता फक्त दोन दिवस उरले आहेत. त्यानंतर ५० रुपये शुल्क लागणार आहे.

## विधानसभा निवडणुकीत मोठा ‘गेम’ होणार

### मनसेचे उमेदवार निश्चित, कुणाकुणाला धक्का बसणार?


**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे प्रचंड घडामोडी घडत आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर आता प्रत्येक पक्षाकडून आगामी विधानसभा निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी केली जात आहे. मनसेनेही त्यादृष्टीने तयारी सुरु केली असून काही उमेदवार निश्चित केले आहेत. त्यामुळे कुणाकुणाला धक्का बसणार याचीच सध्या चर्चा आहे.**

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडून शिवसेना भवन येथे पदाधिकाऱ्यांच्या दररोज बैठका घेतल्या जात आहेत. तसेच राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांमध्ये विधानसभेची जोरात तयारी सुरु आहे. शिंदे गटाचीदेखील नुकतीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी बैठक पार पडलीय. भाजपला यश मिळावं यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे थेट सत्तेतून बाहेर पडण्याच्या तयारीत आहेत. विधानसभेची अशीच लगबग आता मनसे पक्षातदेखील सुरु आहे. मनसेमध्ये तर लोकसभा निवडणुकीच्या आधीपासून ◀◀ पान २ वर

# पीएम किसान: २० हजार कोटी वितरित, १७ वा हप्ता या दिवशी मिळणार

## ■ देशातील ९.२ कोटी शेतकऱ्यांना मिळणार लाभ; पेरणीत कामी येणार रक्कम



### २०,००० कोटी रुपये वितरित केले जाणार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० जून रोजी किसान निधीचा १७ वा हप्ता जारी करण्यासाठी त्यांच्या पहिल्या फाईलवर स्वाक्षरी केली होती. ज्यामध्ये ९.३ कोटी शेतकऱ्यांना १७ वा हप्ता देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. सुमारे २०,००० कोटी रुपये वितरित केले जाणार आहेत. त्यामुळे ही देशातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी आहे.

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १० जून रोजी किसान निधीचा १७ वा हप्ता जारी करण्यासाठी त्यांच्या पहिल्या फाईलवर स्वाक्षरी केली होती. ज्यामध्ये ९.३ कोटी शेतकऱ्यांना १७ वा हप्ता देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. सुमारे




२०,००० कोटी रुपये वितरित केले जाणार

### १८ जूनला पंतप्रधान मोदींचा कसा असेल दौरा

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १८ जूनला काशी येथे शेतकरी परिषद घेणार आहेत. याबाबतची माहिती भाजप काशी प्रदेशाध्यक्ष दिलीप पटेल यांनी अधिकारी व कार्यकर्त्यांना दिली. शेतकरी परिषदेला संबोधित केल्यानंतर पीएम मोदी हे बाबा श्रीकाशी विश्वनाथ यांची पूजा करतील. यानंतर पंतप्रधान मोदी स्थानिक दशाश्वमेध घाटावर गंगा आरतीमध्ये सहभागी होतील.

### १६ वा हप्ता २८ फेब्रुवारीला वितरीत केला होता

मोदी ३.० सरकारचा पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेण्यात आला आहे,.ज्या अंतर्गत किसान सन्मान निधीचा १७ वा हप्ता १८ जून २०२४ रोजी जारी केला जाईल. आत्तापर्यंत केंद्र सरकारने पीएम किसानचे १६ हप्ते लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवले आहेत. पीएम किसान योजनेचा १६ वा हप्ता (पीएम किसान १६ वा हप्ता) २८ फेब्रुवारी २०२४ रोजी हस्तांतरित करण्यात आला होता.

आहेत. ही रक्कम दि. १८ जून रोजी शेतकऱ्यांच्या ◀◀ पान २ वर

# अंतरवालीत आज मराठा–ओबीसी आमने–सामने

### ओबीसी आरक्षण बचावासाठी लक्ष्मण हाकेंचेही आमरण उपोषण

**जालना। प्रतिनिधी**

**सगोयरे व इतर मागण्यासाठी गेले पाच दिवसापासून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा अंतरवली सराटी येथे आमरण उपोषण करत आहेत. दुसरीकडे ओबीसी आरक्षण बचावासाठी प्राध्यापक लक्ष्मण हाके हे देखील अंतरवली सराटी येथे गुरुवारपासून आमरण उपोषणास सुरुवात करणार असल्याने पुन्हा एकदा या भागातील वातावरण चिघळण्याची शक्यता आहे. आंदोलनाच्या माध्यमातून का होईना ओबीसी आणि मराठा पहिल्यांदाच एकाच गावात आमने–सामने येत आहेत.**



चळवळीतील कार्यकर्ता अशी मूळ ओळख असणारे लक्ष्मण हाके हे सुरुवातीला राज्य मागास आयोगाचे सदस्य होते. मात्र मराठा आरक्षण आंदोलनात त्यांनी शासनाच्या भूमिकेच्या निषेधार्थ आपल्या पदाचा राजीनामा देऊन ओबीसी चळवळीचे काम सुरु केले. याचवेळी उद्धव ठाकरे यांनी त्यांना शिवसेना उबाठा गटाचे प्रवक्ते केले होते. अंतरवली सराटी हे सत्ताधाऱ्यांचे आवडीचे गाव असावे म्हणूनच राज्यातील १२ कोटी जनतेची जबाबदारी असणारे शासन येथे उपोषण करणाऱ्या मनोज जरांगे यांचे लाड करीत आहे. त्याचवेळी ओबीसी आरक्षण बचावासाठी आमच्या अनेक कार्यकर्त्यांनी विविध ठिकाणी आंदोलने करूनही शासनाने त्यांच्याकडे कधी ढुंकून देखील पहिले नाही असा आरोप हाके यांनी केला. कायम ओबीसींना हे सरकार दुय्यम वागणूक देत असल्याने मी आता अंतरवली सराटीमध्येच आंदोलन ◀◀ पान २ वर

# कदाचित हे माझे शेवटचे उपोषण–जरांगे



**जालना । प्रतिनिधी**

**कदाचित हे माझे शेवटचे उपोषण असेल, असे सांगत मनोज जरांगे म्हणाले, शिंदे साहेब आणि फडणवीस साहेबांना सांगतो की, मी हे उपोषण असेच स्थगित करु शकत नाही. काही मुद्दे स्पष्ट झाले पाहिजेत, असेही ते म्हणाले.**

अंतरवाली सराटीत उपोषणास बसलेल्या मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या उपोषणचा ◀◀ पान २ वर

### तर विधानसभेच्या तयारीला लागेल

सगळं क्लेअर झाल्यावर उपोषण स्थगित करायला आम्हाला कुठे अडचण आहे. आम्हाला आरक्षण पाहिजे, बाकी काही नाही पाहिजे. पण तुम्ही खेळवत राहिले तर मी आणि माझा समाज डायरेक्ट विधानसभेच्या तयारीला लागेल, असे म्हणत मनोज जरांगे यांनी आपला पुढील प्लॅनच पत्रकार परिषदेतून सांगितला.

### खा.बजरंग सोनवणे यांचेही राज्यपालांना पत्र



मनोज रंगे पाटील यांचे अंतरवालीत उपोषण सुरू असून बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनीही राज्यपालांना पत्र पाठवून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची राज्य सरकारने तत्काळ दखल घ्यावी अशा सूचना कराव्यात, असे सदरील पत्रामध्ये म्हटले आहे.

### परभणीचे खा.जाधव यांचे राज्यपालांना पत्र

परभणीचे खासदार संजय जाधव यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनाला पाठींबा दर्शवला असून राज्यपालांना मराठा आरक्षणप्रश्नी पत्र दिले आहे. त्याबाबतचे दोन लेटर त्यांनी ट्वीट केले आहे.

### ओमराजे थेट अंतरवालीत, महिलांनी अडवली गाडी

धाराशिवचे ठाकरे गटाचे खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. सरकारने या उपोषणाची दखल घेऊन तातडीने पावलं उचलली पाहिजेत. प्रत्येक गोष्टीकडे आपण राजकारण म्हणून बघितले नाही पाहिजे, असे आवाहन करून तामिळनाडू प्रमाणे महाराष्ट्रातही सरकारने प्रयोग करावा, असे ते म्हणाले. यावेळी महिलांनी ओमराजे यांच्या गाडीचा ताफा




अडवून आपण मराठा आरक्षणप्रश्नी विषय लावून धरुन संसदेचे कामकाज बंद पाडा, अशी मागणी केली. त्यावर आपण याबाबत आग्रही असल्याचे सांगितले.

## राज्यात या ७ आमदारांना खासदारकी

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातून १३ आमदारांनी लोकसभा निवडणूक लढवली होती, त्यापैकी फक्त ७ आमदार विजयी झाले. विजयी झालेल्यांमध्ये काँग्रेसचे ५ आणि एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे २ आहेत, तर एक आमदार सध्याच्या महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री आहे. आता या सर्वांना**



**आमदारकीचा राजीनामा द्यावा लागणार आहे.**

काँग्रेस आमदारांमध्ये कल्याण काळे, प्रतिभा धानोरकर, बळवंत वानखेडे, वर्षा गायकवाड आणि प्रणिती शिंदे यांचा समावेश आहे. त्याचवेळी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे संदिपान भुमरे आणि रवींद्र वायकर हेही खासदार झाले आहेत. राज्यमंत्रिपदाची जबाबदारीही संदिपान भुमरे सांभाळत ◀◀ पान २ वर



### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१२ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ८.०० क्विंटल | २,३०१ | ३,३०० | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड : २२.५० क्विंटल | १,६५० | २,३०० | २,०३८ |
| मूग : ०.५० क्विंटल | ७,८१० | ७,८१० | ७,८१० |
| तूर : १०.५० क्विंटल | ९,४०० | ११,५०० | १०,८६० |
| उडीद : ९.५० क्विंटल | २,३३२ | २,६०० | २,४४४ |
| बाजरी: १.५० क्विंटल | २,६११ | २,६११ | ३७.५० |
| चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल | १,७०० | ६,३०० | ४,००० |
| सोयाबीन: ३७.५० क्विंटल | ४,४२० | ४,४२० | ४,४२० |
| हरभरा: २७.०० क्विंटल | ६,४०० | ६,५५० | ६,४७५ |

## ठाकरे गट विधानसभेच्या सर्वच जागा लढवण्याच्या तयारीत

### ■ शिवसेना, मित्रपक्षांच्या जागांचा अहवाल मागवला



**मुंबई । प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत राज्यातील महाविकास आघाडीला मिळालेल्या यशानंतर आता विधानसभेच्या निवडणुकीवर लक्ष केंद्रीत केलं जात आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून ज्या मतदारसंघात सेनेला आघाडी मिळाली आहे, त्यांचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच मित्रपक्षांच्या जागांचाही अहवाल अभ्यासला जाणार आहे. त्यामुळेच राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघाचा अहवाल उद्धव ठाकरेंनी पक्षाच्या संपर्कप्रमुखांकडून मागवला आहे.**

लोकसभेनंतर उद्धव ठाकरे यांच्याकडून विधानसभानिहाय उमेदवारांसाठी चाचपणी सुरू झाल्याचे दिसून येत आहे. लोकसभेच्या निकालावरून आपण मित्रपक्षांसोबत अथवा स्वतंत्र विधानसभा लढली तर काय होईल याचा अहवाल उद्धव ठाकरे यांनी शिवसेना संपर्कप्रमुखांकडे मागितल्याची माहिती आहे. विधानसभा मतदारसंघ ठाकरे गटाला अनुकूल ◀◀ पान २ वर

### मित्रपक्षांनी काम केले की नाही, हे पाहणार

त्याचप्रमाणे लोकसभेमध्ये स्वतःच्या उमेदवाराचे तसेच मित्रपक्षाच्या उमेदवाराचे पदाधिकारी यांनी काम केले की नाही याबाबतचा अहवाल उद्धव ठाकरेंकडून मागवण्यात आला आहे.

## पराभव जिव्हारी, आणखी एका मुंडे समर्थकाने जीवन संपवले

### बीड, लातूर जिल्ह्यात तिसरी आत्महत्या, संयम ठेवण्याची गरज



**बीड । प्रतिनिधी**

**भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव अनेक कार्यकर्त्यांच्या जिव्हारी लागला आहे. त्यानंतर चिंचेवाडी येथे ३६ वर्षीय तरुणाने गळफास घेतल्याची घटना घडली आहे. यापूर्वीही दोन तरुणांनी मुंडे यांचा पराभव झाल्याने जीवन संपवले होते.**

पंकजा मुंडेंचा साडेसहा हजार मतांनी पराभव झाला आणि हा पराभव लोकांच्या इतका जिव्हारी लागला की, आतापर्यंत तिघा जणांनी आत्महत्या केल्या आहेत. भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या नंतर दहा वर्ष प्रीतम मुंडे या खासदार राहिल्या. तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा धनंजय मुंडे यांनी पराभव केला होता. मात्र, ५ वर्ष कोणतेही पद नसताना पंकजा मुंडे संघर्ष करत राहिल्या. त्यानंतर भाजपने २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत प्रीतम मुंडे यांच्या ऐवजी पंकजा मुंडे यांना मैदानात उतरवण्याचा निर्णय घेतला. मात्र, लोकसभेत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी त्यांचा निसटता पराभव केला. त्यानंतर मुंडे समर्थकांच्या हा पराभव जिव्हारी लागल्याचे चित्र आहे. आतापर्यंत तीन समर्थकांनी आपले जीवन संपवले असून चिंचेवाडी येथील एका ३६ वर्षीय तरुणाने पंकजा मुंडे यांचा पराभव जिव्हारी लागल्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे.

# अनेक दिवसांपासून रखडलेल्या शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा


## शिक्षण आयुक्तांनी प्रसिध्दीपत्रक काढून दिली भरतीला मान्यता

**मुंबई । पतिनिधी**

**राज्यात अनेक दिवसांपासून रखडलेली शिक्षक भरती सुरू होणारेय. शिक्षण आयुक्तांनी प्रसिद्धीपत्रक काढून शिक्षक भरतीची प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची खबरदारी प्रक्रिया राबवताना घ्यावी लागणार आहे.**

राज्यात शिक्षक भरती अनेक दिवसापासून रखडली होती. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या शिक्षक भरती परीक्षेच्या गुणवत्ता यादीतील उर्वरित उमेदवारांच्या नियुक्तीबाबतची कार्यवाही संबंधित व्यवस्थापनांना पूर्ण करता येणार आहे. दरम्यान समांतर आरक्षणातील भरतीलाही परवानगी देण्यात आली आहे.

शिक्षक भरतीबाबत प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले आहे. पवित्र पोर्टल मार्फत



शिक्षक भरती करण्यात येते. पदवीधर / शिक्षक मतदार संघाच्या प्रक्रियेवर प्रभाव पडून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होईल अशी कोणतीही कृती घडणार नाही, याबाबत खबरदारी घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत शाळेतील शिक्षक पदभरती बाबतची प्रक्रिया राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिद्ध केलेल्या गुणवत्ता ◀◀ पान २ वर

### अशी होईल प्रक्रिया

समांतर आरक्षणाबाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थाअंतर्गत शाळेतील शिक्षक पदभरतीची व्यवस्थापन निहाय सर्वसाधारण गुणवत्ता यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पुढील प्रक्रिया होईल. कोणत्याही अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये असे आवाहन या प्रसिद्धीपत्रकात करण्यात आले आहे.

cmyk

## अग्रलेख

# ‘नीट’च्या पेपरफुटीने विश्वासार्हतेला तडा

डॉक्टर होण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या विश्वासाला तडा जाणारा गैरप्रकार पहिल्यांदाच देशभर गाजत आहे. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले आहे. यावर्षी झालेली नीट यूजी परीक्षा रद्द करण्यात यावी आणि पुनर्परीक्षा घेण्यात यावी, या संदर्भात याचिका दाखल करण्यात आली. सुनावणीच्या वेळी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकालानंतरच्या प्रक्रियेला तूर्तास स्थगिती देण्यास नकार दिला असला तरी, परीक्षा आयोजित करणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) या संस्थेला जाब विचारला आहे. या संदर्भात नोटीस जारी करून अहवाल मागवला आहे. तसेच या परीक्षेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला असून यावर सविस्तर उत्तर देण्यात यावे, अशी टिप्पणी न्यायालयाने लगावली आहे. पुढील सुनावणी आता ८ जुलै रोजी पार पडणार असल्याने, सर्वोच्च न्यायालय काय निर्णय देणार याकडे लक्ष लागले आहे.

एकीकडे विद्यार्थी पालकांच्या वतीने न्यायालयाचे दरवाजे ठोठावण्यात आले असताना, महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनीही नीट परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी मागणी केली होती. त्यामुळे नीट यूजीच्या परीक्षेत नक्कीच गोंधळ झाला असावा, असा संशय बळावण्यास जागा निर्माण झाली. दुसरीकडे तामिळनाडूमध्ये नीट यूजी परीक्षेवरून गेल्या तीन वर्षांपासून गोंधळाचे वातावरण आहे. २०२१ मध्ये द्रमुकचे सरकार आल्यानंतर, नीट परीक्षेचा विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर होणाऱ्या परिणामांचा आढावा घेण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती. या समितीने विद्यार्थी, पालक आणि नागरिकांशी संवाद साधून आणि या परीक्षेसंबंधी विस्तृत माहिती गोळा करत तिचे विश्लेषण करून एक अहवाल तयार केला. त्या समितीने नुकताच ‘नीट’ परीक्षेबाबत सरकारला अहवाल सादर केला आहे. हा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर, नीट परीक्षा ही गरीब विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी आणि सामाजिक न्याय विरोधी असल्याचे तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी म्हटले आहे.

वैद्यकीय शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नीट म्हणजे National Eligibility cum Entrance Test ही महत्त्वाची परीक्षा घेतली जाते. मेडिकल कॉलेजला याच परीक्षेतील गुणांवर मेरिट लिस्ट तयार केली जाते. एकूण ७२० मार्कांच्या या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना योग्य पर्याय निवडून आपली उत्तरे द्यायची असतात. यामध्ये प्रत्येक बरोबर उत्तरासाठी विद्यार्थ्यांना ४ मार्क मिळतात, तर प्रत्येक चुकीच्या उत्तरामागे १ मार्क कापला जातो.

नीट परीक्षेचा निकाल ४ जूनला लागला. ओएमआर शीट फाडल्याचा आरोप होत आहे. अनेक विद्यार्थ्यांचे निकाल ऑनलाइन दाखवले जात नाहीत. अनेक विद्यार्थ्यांचे गुण कमी आहेत, म्हणजेच त्यांना ओएमआर शीटनुसार जे गुण मिळायला हवे होते, ते मिळालेले नाहीत. अशा विविध कारणांमुळे देशभरातील विद्यार्थ्यांनी या निकालावर आक्षेप घेतला. परीक्षेचे आयोजन योग्य प्रकारे करण्यात आल्याचा आरोप करत परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी विद्यार्थी वर्गातून करण्यात आली. राजस्थान, हरियाणा येथील विद्यार्थ्यांनी सोशल मीडियावर या संदर्भात टाकलेल्या पोस्टनंतर, विद्यार्थ्यांच्या मनात आता आपले नक्की काय होणार हा प्रश्न पडला असेल. संशयास्पदरीत्या समान रोल नंबर, निकाल जाहीर करण्याच्या तारखेत अचानक झालेला बदल आणि पेपर लीकचे आरोप यामुळे नीट यूजीचा यंदाचा निकाल खरा मानायचा का अशी भावना विद्यार्थी, पालकांमध्ये निर्माण झाली. कारण, नीट परीक्षेचा निकाल १४ जूनला लागेल, असे जाहीर करण्यात आले होते. पण ४ जूनला देशामध्ये सार्वत्रिक निवडणुकांचे निकाल जाहीर होत असतानाच अचानक नीट परीक्षेचा निकाल दहा दिवस आधीच जाहीर करण्यात आला. त्यामुळे संशयाची सुई निर्माण झाली. ५ मे रोजी या वर्षीची नीट परीक्षा झाली होती. या परीक्षेसाठी २४ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २३ लाख ३३ हजार विद्यार्थी परीक्षेला बसले.

२०२२ मध्ये पैकीच्या पैकी गुण कोणालाही मिळाले नाहीत. २०२३ मध्ये देशभरातून फक्त दोन मुलांना असे शंभर टक्के मार्क मिळाले होते. या परीक्षेतल्या चार टॉपर्सना ७२० पैकी ७१५ मार्क मिळाले होते. यंदा मात्र ६७ विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले आहेत. त्यामुळे या निकालात अनपेक्षित घडल्याने पेपरफुटी आणि परीक्षेच्या निकालात घोळ झाल्याचा आरोप विद्यार्थी आणि पालकांकडून केला जात आहे. विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण व्हावा, अशा काही गोष्टी सोशल माध्यमातून जनतेमध्ये पसरल्या आहेत. अनेक नीट परीक्षेचे टॉपर्स एकाच परीक्षा केंद्रातील आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी ७१८, ७१९ गुण मिळवले, ते नीट मार्किंग योजनेनुसार अशक्य असल्याचा दावा केला गेला आहे. त्यामुळे बारावी सायन शाखेच्या उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारेच वैद्यकीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावेत, या मागणीला जोर धरू लागला आहे. राज्याराज्यांनी कितीही आदळआपट केली तरीही केंद्रीय स्तरावरील नीट परीक्षेमार्फतच मेडिकल कॉलेजच्या प्रवेशाचा मार्ग जात असल्याने, नीटची जरी विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असले तरी, मेडिकलच्या प्रवेशासाठी भविष्य टांगणीला बांधलेल्या लाखो विद्यार्थ्यांपुढे मेरिट लिस्टच्या यादीत आपले नाव झळकते का? याची प्रतीक्षा करणे सध्या तरी हाती आहे.

---

*संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २४ व्या पुण्यस्मरणार्थ द्वितपपूर्ती सोहळा*

## अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन-ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर

**नेकनूर । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील चाकरवाडी येथे सद्गुरू संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या २४ व्या पुण्यस्मरणार्थ द्वितपपूर्ती सोहळा व भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन ह.भ.प.महादेव (तात्या) महाराज चाकरवाडीकर यांनी केले आहे.ह.भ.प. तपोनिधी, शांतीब्रह्म गुरुवर्य श्री महादेव महाराज (तात्या) चाकरवाडीकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम संपन्न होणार आहे.**

‘विसाव्या शतकातील महान संत विभूती‘‘सद्गुरु संत श्री ज्ञानेश्वर माऊली महाराज क्षेत्र चाकरवाडी यांच्या २४ व्या पुण्यस्मरणार्थ द्वितपपूर्ती सोहळा व भव्य दिव्य अखंड हरिनाम सप्ताहयास दिनांक १४ जून २०२४ पासून आरंभ होणार असून दिनांक २१ जून २०२४ रोजी सांगता होणार आहे. संगीतमय श्रीराम कथा श्रीराम कथाप्रवक्ते-श्री संत ज्ञानेश्वर माऊली दादा कृपाकिंत रामायणाआचार्य श्री हे.भ.प समाधान महाराज शर्मा यांची कथा दुपारी २ ते ५ या वेळेत होणार आहे. दिनांक १४ जून२०२४ रोजी सायंकाळी ६ ते ८ सुंदर कांड सत्संग मंडळ गेवराई, बीड,यांचे भजन, रात्री ८-३० वाजता मठा अधिपती महंत ह.भ. प. लक्ष्मण महाराज मेगडे यांचे कीर्तन सेवा, दिनांक १५ जून रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता भजन सम्राट श्री शिवकुमार जी मोहेकर व सहकारी अंबाजोगाई यांचे भजन, रात्री८-३० वाजता संतपीठाचार्य श्री ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले यांचे कीर्तन सेवा,



दिनांक १६ जून रोजी सायंकाळी ६-०० वाजता भजन सम्राट प्रा. श्री आश्रम जोशी व त्यांचे सहकारी अंबाजोगाई यांचे भजन, रात्री ८-३० वाजता धर्मगुरू श्री ह. भ.प. अमृताश्रम स्वामी महाराज जोशी यांचे कीर्तन सेवा, दिनांक १७ जून रोजी सायंकाळी ६-०० वाजता चक्रीभजन-गुरुवर्य श्री ह. भ.प. गुरुबाबा महाराज औसेकर यांचे भजन, रात्री ८-३० वाजता प्रेममूर्ती मठाधिपती महंत श्री ह.भ.प. शिवाजी महाराज यांचे कीर्तन सेवा, दिनांक १८ जून रोजी सायंकाळी ६-०० वाजता सुरमणी पं. श्री बाबुरावजी बोरगावकर, तालमणी डॉ. श्री राम बोरगावकर सरस्वती बोरगावकर यांचे भजन, रात्री ८-३० वाजता व्याकरणाचार्य श्री ह.भ.प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन सेवा, दिनांक १९ जून रोजी सायंकाळी ६-०० वाजता श्री ह.भ.प मनोहर महाराज मुंडे गुरुजी यांचे भजन, रात्री ८-३० वाजता भागवताचार्य श्री ह.भ.प. पद्माकर महाराज देशमुख यांचे कीर्तन सेवा, दिनांक २० जून रोजी सायंकाळी ६-०० वाजता श्री सुनील पासलकर पुणे यांचे भजन, रात्री ८-३० वाजता ज्ञानसिंधू श्री ह.भ.प. संदिपान महाराज शिंदे हासेगावकर यांचे कीर्तन सेवा, दिनांक २१ जून २०२४ रोजी वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य श्री ह.भ.प. रामरावजी ढोक महाराज यांचे काल्याचे किर्तन होईल. १० ते १२ नंतर महाप्रसादीक महापंगती होतील. तरी या सोहळ्यास महाराष्ट्रातील ख्यातकिर्त दिग्गज गायनाचार्य व वादळणाचार्य यांची सेवा लागणार आहे तरी पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन महादेव (तात्या) महाराज चाकरवाडीकर यांनी केले आहे.

---

## पोलीसांची पेट्रोलिंग नावालाच नागरीकांमध्ये भितीचे वातावरण

### चोरट्यांनी सिरसाळ्यात मंदिरातील दानपेटी फोडून रक्कम लांबवली;तीन ज्वेलर्ससह दोन खताची दुकानेही फोडली

**परळी वै. । प्रतिनिधी**

**अज्ञात चोरट्यांनी रात्रभर सुरू असलेल्या पावसाचा फायदा घेत सिरसाळ्यात रात्रीतून ठिकठिकाणी धुडघूस घातला. मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रक्कम लंपास केली. त्यानंतर तीन सोन्या-चांदीच्या दुकानांसह दोन खताची दुकानेही फोडली. दरम्यान एकाच रात्री चोरट्यांनी पाच ते सहा ठिकाणी चोरी केल्याने नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे.**

परळी तालुक्यातील सिरसाळा येथे अज्ञात चोरट्यांनी परमपुज्य गुरू वामनानंद महाराज जन्मभूमी मंदिरातील दानपेटी फोडून त्यातील रक्कम लंपास केली. त्यानंतर चोरट्यांनी लक्ष्मण कालिदास निर्मळ पाटील यांच्या लहुदास ॲग्रो सर्व्हीसेस या दुकानाचे शटर उचकटून तेथून काही बियाणांच्या बॅगा लंपास केल्या. यासह आणखी एका खताच्या दुकानातून माल लांबवला. त्यानंतर चोरट्यांनी आपला मोर्चा ज्वेलर्स दुकानांकडे वळविला. चोरट्यांनी वैद्यनाथ ज्वेलर्स, विठ्ठल ज्वेलर्स, गणेश ज्वेलर्स याठिकाणीही शटर उचकटून आतमध्ये प्रवेश करून तेथील काही ऐवज लंपास केला. या प्रकरणात दुपारी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान दानपेटी फोडतांनाचे चोरट्यांचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले असुन त्यामध्ये दोन चोरटे मंदिराच्या गेटसह दानपेटी फोडतांना दिसत आहेत. या प्रकाराने सिरसाळा आणि परिसरात भितीचे वातावरण पसरले असुन पोलीसांनी या प्रश्न लक्ष घालावे अशी मागणी होवू लागली आहे.

---

# त्या लाच खोर अधिकाऱ्यावर कारवाई होणार का ?

## माजलगाव चा अभय संरक्षण केंद्रात अनाथ मुलांना योजने चा लाभ मिळेल ना

**टाकरवन प्रतिनिधी**

**माजलगाव पंचायत समिती मधील महिला व बालविकास अभय केंद्र कार्यालयातील संरक्षण अधिकारी अनाथ मुलांच्या योजनेसाठी लाच मागत असल्याची तक्रार टाकरवन येथील कपिल आडगळे यांनी महिला व बालविकास आयुक्त पुणे यांच्याकडे केली होती.तक्रार देऊन महिना लोटला मात्र अध्याप त्या लाचखोरा अधिकाऱ्याची चौकशी झाली नाही. प्रस्ताव देऊन सहा मिहने लोटले तरीही अनाथ मुलांना योजनेचा लाभ भेटला नाही.सामान्यांना न्याय व योजनेचा लाभ मिळत नसल्याने बीड प्रशासनाचा कारभारावर शंका निर्मान होत आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालकविकास विभाग मार्फत बाल संगोपन योजनेच्या माध्यमातून अनाथ मुलांच्या पालनपोषणासाठी महिन्याला आर्थिक मानधन दिले जाते.माजलगाव पंचायत समिती मधील अभय संरक्षण केंद्रात बाल संगोपन योजनेसाठी अर्ज करण्यास गेलेल्या नागरिकांना तेथील संरक्षण अधिकारी पैशाची मागणी करत असल्याने.टाकरवन येथील कपिल आडागळे यांनी महिला व बालविकास आयुक्त पुणे यांच्याकडे तक्रार करून लाचखोर अधिकाऱ्याचा कारभार चव्हाट्यावर आणला होता. मात्र तक्रार करून महिना लोटला तरी अद्यापही या अधिकाऱ्यावर कोनतीही कारवाई झाली नाही.तसेच सहा महिन्यापासून योजनेच्या लाभासाठी टाकरवन येथील कु.आकाश त्रिबंक अडागळे कु.वैष्णवी त्रिबंक अडागळे कु.शिवानी त्रिबंक अडागळे यां अनाथ मुलांचा अर्ज देऊनही योजनेचा लाभ मिळाला नाही. वरिष्ठांनी तात्काळ लक्ष घालून लाचखोर अधिकाऱ्यावर कारवाई करावी व अनाथ मुलांना योजनेचा लाभ देऊन न्याय द्यावा अशी मागणी कपील अडागळे यांनी केली आहे.

### तक्रारदाराला धमक्या

माझा भावाचे मुले आनाथ आहेत योजनेचा लाभघेन्यासाठी सहा महिन्यापुर्वी आर्ज केलेला आहे.लाच मागितल्याने संतोष अंकुश डोंगरदिवे या अधिकाऱ्याची मि तक्रार केली.तक्रार का केली म्हणून मला वेगवेगळ्या लोकामार्फत तू माजलगाव ला ये तुझ्याकडे बघतो अशा धमक्या दिल्या जात असल्याने मि भयभीत झालो आहे.या अधिकाऱ्यामुळेच मला धमक्या येत आहेत.अशी प्रतिक्रिया तक्रादार कपिल आडागळे यांनी दिली आहे.येथील अधिकारी लाभार्थ्याकडुन दोन हजाराची मागणी करतो व रीतसर लेखी पुरावे देत नाही.या सर्व प्रकाराची चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी मि कपिल आडागळे करत आहे.

### चौकशीचे आदेश आर्धा तासात रद्द?

माजलगाव येथील अभय संरक्षण अधिकारी अनाथ मुलाच्या योजने साठी पैसे मागत असल्याने कपिल आडगळे यांनी महिला व बालविकास आयुक्त पुणे यांना लेखी तक्रार दिली होती.त्यानंतर मंगेश जाधव चौकशी समीती अध्यक्ष तथा परिविक्षा अधिकारी बीड यांनी त्रिसदस्यीय समिती गठीत करून २१ मे रोजी चौकशीचे आदेश पत्र काढले होते व तक्रारदारास हजर राहण्यास कळवले होते.मात्र आदेश काढल्यानंतर अर्ध्या तासातच चौकशी रद्द झाल्याचा निरोप मंगेश जाधव यांनी फोन द्वारे तक्रार दारास दिला आसल्याची माहीत तक्रार दाराने दिली.चौकशीचे आदेश अर्ध्या तासात रद्द का करण्यात आले.लाचखोर अधिकाऱ्यावर कारवाई का होत नाही.चौकशीच्या आदेशाचा सावळा गोंधळ काय आहे याचे कारण समजत नसल्याने प्रशासनावरचा विश्वास उडाल्याची माहिती तक्रारदाराने दिली आहे.

---

## ‘तुझं स्थान माझ्या आयुष्यात खास होतं आणि नेहमीच राहील

### रक्षा खडसेंसाठी प्रीतम मुंडेंची पोस्ट

**बीड । प्रतिनिधी**

**बीडच्या माजी खासदार प्रीतम मुंडे यांनी रावेरच्या भाजप खासदार रक्षा खडसे यांच्यासाठी भावनिक पोस्ट केली आहे. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत रावेरमधून रक्षा खडसे यांनी शरद पवार गटाचे श्रीराम पाटील यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. रक्षा खडसेंना आता केंद्रीय मंत्रिमंडळात स्थानही मिळाले. मागील १० वर्षांमध्ये संसदेत रक्षा खडसे आणि प्रीतम मुंडे एकत्रच होत्या. त्यावेळी त्यांची मैत्री घट्ट झाली होती. केंद्रात मंत्रिपदावर विराजमान झाल्यानंतरही रक्षा खडसे यांनी प्रीतम मुंडे यांची आठवण काढली होती. आता प्रीतम मुंडे यांनीही रक्षा खडसे यांच्यासाठी खास पोस्ट केली आहे. या पोस्टची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरु आहे.**

केंद्रामध्ये नव्याने मंत्री झालेल्या रक्षा खडसे यांनी मुलाखत देताना जिवलग मैत्रीण प्रीतम मुंडे यांची आठवण काढून भावनिक झाल्याचे चित्र पाहायला मिळालं. प्रीतम मुंडे यांची आठवण काढून रक्षा खडसे यांना गहिवरून आले, आता डॉक्टर प्रीतम मुंडे यांनी रक्षा खडसे यांच्यासाठी इंस्टाग्रामवर पोस्ट केली आहे. स्वार्थी जगात आपली मैत्री दृष्ट लागण्यासारखी आहे, असे प्रीतम मुंडे यांनी इन्स्टाग्राम पोस्टमध्ये म्हटलेय. १० वर्ष ही खूप काही देऊन गेली , बहुतेक चांगलंच. मंत्रिपदावर विराजमान झाल्यानंतर जल्लोष साजरा करण्यापेक्षा आपली मैत्रीण संसदेत नाही म्हणून गहिवरून येणारी तू ! रक्षा ;आजच्या एवढ्या स्वार्थी जगात आपली मैत्री दृष्ट लागण्यासारखीच आहे.. पक्षातील निवडणूक निरीक्षकांना एकमेकांच्या शिफारसी करणाऱ्या, स्वतःच तिकीट जाहीर झालं की नाही यापेक्षा मैत्रिणीचं तर झालं न हे बघणाऱ्या, निकालाच्या दिवशी स्वतःचे उतार चढाव हाताळताना देखील एक नजर कायम दुसरीच्या निकालाकडे ठेवणाऱ्या. १० वर्ष सतत संसदेत शेजारी बसणाऱ्या, पक्षाच्या बैठकांना एकत्रच जाणाऱ्या, दिल्लीत एकाच मजल्यावर राहणाऱ्या, एकमेकींना राजकीय घटनांपासून कपड्यांच्या रंगसंगतींपर्यंत सल्ले देणाऱ्या आपण . संसदेतली विधेयकांची चर्चा करणाऱ्या आपण, अनेक देवदर्शनांना देखील एकत्रच गेलो! १० वर्षातला प्रवास तुमच्या सगळ्यांच्याच सोबतीने खूप छान झाला, पण तुझं स्थान माझ्या आयुष्यात खास होत आणि नेहमी राहील. आजच्या या स्वार्थी जगात निस्वार्थ मैत्री जपणारी माझी मैत्रीण रक्षा तुला या यशाच्या कोटी कोटी शुभेच्छा आणि तुझ्या हातून आजपर्यंत घडलं तसंच चांगलं कार्य घडो, सतत लोकसेवा तुझ्या हातून घडो हीच ईश्वरचरणी प्रार्थना



**बीडः अरुणराव चौरे उर्फ आबा, यांची मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सदस्य पदी निवड झाल्याबद्दल, हिंद मैत्री ग्रुप बीड सर्व सदस्यांच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी बहुसंख्य सदस्य उपस्थित होते व सर्वांनी त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.**

---

## पान १वरून...

### पीएम किसान: २० हजार कोटी

बँक खात्यावर जमा होणार आहे. ऐन पेरणीत ही रक्कम येणार असल्याने देशातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी आहे. किसान सन्मान निधीची प्रतीक्षा आता संपली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १७ व्या हप्त्याचे पैसे काशीमधून योजनेच्या लाभार्थ्यांच्या खात्यात सोडणार आहेत. याआधी १० जून रोजी पीएम मोदींनी पीएम किसान योजनेच्या फाइलवर स्वाक्षरी केली होती. त्यांच्या तिसऱ्या कार्यकाळातील ही पहिली फाईल होती, जी त्यांनी पास केली आहे. शेतकऱ्यांना मदत करणाऱ्या या योजनेच्या १६ हप्त्यांमध्ये आतापर्यंत १२ कोटी ३३ लाखाहून अधिक लाभार्थ्यांना ३ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम डीबीटीमधून थेट वितरित करण्यात आली आहे.

-----------

### विधानसभा निवडणुकीत

हालचाली सुरु होत्या. त्यामुळे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकसभेत महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला. ठाकरेंनी महायुतीसोबत जागावाटपावर चर्चा केली नाही. पण आगामी विधानसभेसाठी राज ठाकरे यांना भाजपकडून भक्कम आश्वासन मिळाल्याची चर्चा आहे. त्यामुळे मनसेने २८८ जागांपैकी काही जागांची तयारी सुरु केली आहे. आदित्य ठाकरे यांच्या विरोधात मनसे संदिप देशपांडे यांना उतरवणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अनेकांना धक्का बसणार आहे.

-------------------

### कदाचित हे माझे शेवटचे

आज ५ वा दिवस असून त्यांची प्रकृती खालावली आहे. राज्य सरकारने सगेसोयरेची अंमलबजावणी करावी, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे, या मागणीसाठी त्यांच्या उपोषणाचा लढा सुरू आहे. उपोषणाला आमदार, खासदारांचा पाठिंबा मिळत असून अनेकजण त्यांच्या भेटीसाठी येत आहेत. त्यातच, बार्शीचे आमदार राजेंद्र राऊत यांनी मध्यरात्री २.३० वाजता त्यांची भेट घेऊन उपचार घेण्याची विनंती त्यांना केली होती. त्यानंतर, मध्यरात्री जरांगे यांनी सलाईन घेतले. तर, आज दुपारी पत्रकार परिषद घेऊन आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट केली आहे. मी शिंदे साहेबांना आणि गृहमंत्री फडणवीस साहेबांना सांगतो की, मी हे उपोषण असंच स्थगित करू शकत नाही. कारण, काही गोष्टी डिटेल्समध्ये माहिती झाल्या पाहिजेत. सगे सोयऱ्याची अंमलबजावणी तुम्ही लगेच करणार आहात का, किती दिवस लागणार आहेत?, केसेस लगेच मागे घेणार की किती दिवसात करणार?, हैदराबादचे गॅझेटला किती दिवस लागेल, हे मला आणि माझ्या समाजाला डिटेल्स पाहिजे, अशी मागणी मनोज जरांगे यांनी केली.

------------

### अंतरवालीत आज

करण्याचा निर्णय घेतल्याचे हाके यांनी सांगितले. या गावाचा त्यासाठी मला आग्रह होत असून आम्ही सनदशीर मार्गाने येथे गुरुवारपासून आमरण उपोषणाला सुरुवात करत असल्याचे त्यांनी सांगितले. यासाठी परवानगी मागणारा अर्ज देखील दिला असून परवानगी देऊ अथवा न देऊ दे आम्ही आमच्या घटनेने दिलेल्या अधिकारानुसार हे आमरण उपोषण करणार आहे. यात आमचा जीव गेला तरी हरकत नसल्याचा दावा हाके यांनी केला. त्यामुळे आंदोलनाच्या माध्यमातून का होईना गुरुवारी अंतरवलीत ओबीसी आणि मराठा आमने-सामने येणार आहेत.

------------

### ठाकरे गट विधानसभेच्या

आहे का? असल्यास उमेदवार कोण असावा? तसेच संभाव्य विजयाचे समीकरण कसे असेल याबाबत ठाकरेंनी अहवाल मागितला असल्याची माहिती आहे.

----------

### राज्यात या ७ आमदारांना

आहेत. दरम्यान, महाराष्ट्र विधानसभेचा कालावधी काही महिन्यांचा राहिल्याने या जागा आता रिक्त राहण्याची चिन्हे आहेत. आता या सर्वांना आमदारकीचा राजीनामा द्यावा लागणार आहे. तसेच राजीनामा दिल्यावर आपल्या विधानसभा मतदार संघाच्या पुढच्या राजकीय वारसदाराचे नियोजनही करावे लागणार आहे.

--------

### अनेक दिवसांपासून रखडलेल्या

यादीतील उर्वरित उमेदवारांच्या नियुक्ती बाबतची कार्यवाही संबंधित व्यवस्थापनांना पूर्ण करता येईल. दरम्यान समांतर आरक्षणातील पदे भरण्याची कार्यवाही करण्याच्या दृष्टीने प्रचलित शासन निर्णयांप्रमाणे संबंधित विभागांचे अभिप्राय प्राप्त करून पदभरतीची कार्यवाही करण्याबाबत शासनाने परवानगी दिली आहे. त्यानुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणातील पदे रूपांतरित करण्यास ना हरकत प्राप्त करण्यासाठी आयुक्तालयातील उपसंचालक यांनी संबंधित कार्यालयास समक्ष भेट देऊन प्रस्ताव सादर केला आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून जलद गतीने मान्यता देण्यासाठी विनंती केली आहे.

---

## ज्ञानराधाच्या ठेवीदारांचा पैशाचा मार्ग मोकळा

### आय सी आय सी आय बँकेकडे आला अधिकृत मेल

**बीड । प्रतिनिधी**

**ज्ञानवराधा मल्टीस्टेटच्या ठेवीदारांसाठी पैशाचा मार्ग मोकळा झाला असून आयसीआयसीआय आणि संबंधित कंपनी यांच्यामध्ये कम्युनिकेशन झाल्याचा मेल नुकताच प्राप्त झाला आहे यामुळे येत्या दोन दिवसात ठेवीदारांना पैसे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

गेल्या काही महिन्यांपासून ज्ञानराधा मल्टीस्टेट अडचणीत सापडल्यामुळे ठेवीदारांचे पैसे देण्यास विलंब होत आहे.मात्र यातून मार्ग काढत ठेवीदारांसाठी पैशाची व्यवस्था केली असून गेल्या दोन दिवसांपासून यामध्ये मोठ्या प्रमाणावर हालचाली सुरू होत्या बुधवारी सायंकाळी संबंधित कंपनीकडून आयसीआयसीआय बँकेकडे मेल प्राप्त झाला असून तांत्रिक अडचणी दूर करून येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये ठेवीदारांच्या खात्यावर थेट पैसे देण्याची प्रक्रिया ज्ञानराधाच्या वतीने सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाले आहेत. ठेवीदारांनी काही दिवसांसाठी संयम ठेवून ज्ञानराधा मल्टीस्टेट च्या प्रशासनाला सहकार्य केल्यास ठेवीदारांचे पैसे मिळण्याचा मार्ग मोकळया होण्याची शक्यता आहे.

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि.१३ जून २०२४



## मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात प्रा. गंगाधर शेळके यांनी आदर्श निर्माण केला : राजकिशोर मोदी

**परळी । प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात क्रांती करून जागृती पतसंस्था व जागृती मल्टीस्टेटच्या माध्यमातून विश्वास कमवणारे व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. गंगाधरराव शेळके असून प्रा. गंगाधरराव शेळके यांनी सहकार क्षेत्रात एक आदर्श निर्माण केला आहे. सध्या बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्र मोठ्या अडचणीत सापडलेले असतानाही प्राध्यापक गंगाधरराव शेळके यांनी सहकार क्षेत्रात मोठा विश्वास कमावला आहे असे प्रतिपादन अंबाजोगाई पीपल्स बँकेचे अध्यक्ष तथा कापूस पणन महासंघाचे संचालक राजकिशोर मोदी यांनी केले ते प्रा. गंगाधरराव शेळके यांच्या अमृत महोत्सवी सोहळ्यानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते.

# स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात न्युरोसर्जनचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यासाठी प्रस्ताव दाखल

## आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांचा पुढाकार; ३० खाटा व स्वतंत्र शस्त्रक्रिया विभागाचा प्रस्ताव दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात न्युरो सर्जन विभागाचा स्वतंत्र विभाग सुरू करण्यात यावा, यासाठी ३० खाटांचा स्वतंत्र वॉर्ड, आवश्यक मनुष्यबळ व स्वतंत्र शस्त्रक्रिया गृहाची निर्मिती करण्यात यावी असा प्रस्ताव वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे पाठवण्यात आला आहे.

मराठवाड्यातील आशिया खंडात नावाजलेला अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात विविध अपघातात गंभीर जखमी झालेल्या तसेच हेड इंज्युरीने जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा रुग्णांना तात्काळ उपचार मिळण्यासाठी न्युरो सर्जरीचा विभाग तातडीने सुरु करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ, यंत्रसामुग्री, स्वतंत्र वॉर्ड व स्वतंत्र शस्त्रक्रिया गृह विभाग निर्माण करणे आवश्यक आहे.

सध्या या वैद्यकीय महाविद्यालयात सर्जरी विभागाच्या ३० खाटांचा न्यूरोसर्जन विभाग अस्तित्वात असून सदरील बेड एम सी. आय. मानांकाच्या व्यतिरीक्त मंजूर करण्यात यावा व नवीन न्यूरोसर्जन विभागासाठी मनुष्यबळ निर्मिती एमसीआय. मानंकानुसार मान्यता देण्यात यावी अशी मागणी केज विधानसभेच्या आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांनी केली आहे.

**स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव दाखल**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालय विभागात स्वतंत्र न्युरो सर्जन विभाग सुरू करण्यासाठी स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाच्या वतीने वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाकडे रीतसर प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. प्रभारी अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे प्रभारी अधिष्ठाता स्वाराती.

### नमिताताई मुंदडा यांचा पुढाकार...

**स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात न्युरो सर्जन चा स्वतंत्र विभाग सुरू करण्यासाठी माजी खासदार प्रितमताई मुंडे व भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांच्या मार्फत वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे पाठपुरावा सुरु आहे.**



### मनुष्य बाळासाठी २ कोटी १३ लाखांचा प्रस्ताव

स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात न्युरो सर्जरी विभागाचा स्वतंत्र वॉर्ड सुरू करण्यासाठी आवश्यक असलेल्या मनुष्यबळाच्या वेतनासाठी प्रति वर्षे २ कोटी १२ लाख ८७ हजार ३५७ रुपयांची तरतूद करण्यात यावी अशी मागणी या प्रस्तावात करण्यात आला आहे.

### शस्त्रक्रिया गृहासाठी ४२ कोटी ५६ लाखांचा प्रस्ताव

न्युरोसर्जन विभागाचा स्वतंत्र शस्त्रक्रिया गृह निर्मितीसाठी यंत्रसामग्री व विविध उपकरणे खरेदी करण्यासाठी या प्रस्तावात ४२ कोटी ५६ लाख ६ हजार २४९ रुपयांचा प्रस्ताव दाखल करण्यात आला असल्याची माहिती प्रभारी अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली.



**बीड : वंचितांना व निरांधारांना सतत मदत करणारे पेठ बीड पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक राजू तुकाराम गुळभिले यांना नुकताच राष्ट्रपती पोलीस पदक मिळाल्याबद्दल मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने दिनांक १२ जून २०२४ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात त्यांचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन डॉ. संजय तांदळे यांनी सन्मान केला. यावेळी बीड शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर उपस्थित होते.**

## शिकाऊ उमेदवार भरती निवड प्रक्रिया

**बीड । प्रतिनिधी**

महाराट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बीड विभाग सन २०२४-२५ या सत्रात विविध व्यवसायात शिकाऊ उमेदवार निवडीची प्रक्रिया सुरु करण्यात आकेंद्र शासनाने तयार केलेल्या एम. आय. एस पोर्टलवर , . या वेबसाई शिकाऊ उमेदवार भरतीची कार्यवाही प्रथम ऑफलाईन पध्दतीने व नंतर ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार शिकाऊ उमेदवार निवडी बाबत विविध व्यवसायात भरावयाच्या जागा, विद्यावेतन, शैक्षण , वय, शुल्क, शेवटची तारीख इत्यादी अटी व शर्तीच्या माहितीसाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या वरील वेबसाईटवर किंवा विभागीय कार्यालय, राज्य परिवहन बीड ४३११२२, दुरध्वनी क्र. ०२४४२ २२२५८० यावर संपर्क साधवा.

## अर्धवट राहिलेले धोकादायक पुलाचे काम पूर्ण करण्याचे सोडून पुलाखाली भराव कशाला टाकता? -ग्रामस्थांचा सवाल

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील साबलखेड ते आष्टी असा १७ किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाचे गेल्या दीड वर्षांपासून काँक्रीटीकरणाचे काम अतिशय कासवगतीने चालू असून ठिकाणी ठिकाणी लहान मोठे नाल्यावरील नदीवरील पुलाचे सुध्दा नव्याने काम सुरू आहे कडा,शेरी बु , खाकळवडी, जळगाव, कासारी येथे मोठमोठ्या नदीवरील पुलाचे काम नव्याने करण्यात येत आहे तसेच कडा येथे अमोलक जैन विद्यालय , पेट्रोल पंप , शेरी बु येथे - २, वटनवाडी-३,कासारी येथे असे लहान लहान ओढ्यावर पुलाचे काम चालू असून ते पावसाळ्याच्या अगोदर पूर्ण करणे गरजेचे होते तसे आश्वासन राष्ट्रीय महामार्गाचे संबंधित अधिकारी यांनी दिले होते परंतु त्याचे आश्वासन पाऊसाबरोबर वाहून जाण्याची शक्यता नाकारता





येत नाही मागील वर्षी अचानक आलेल्या ढगफुटी पावसाने प्रशासनाला अनुभव असताना वास्तविक पाहता पावसाळ्यात तालुक्यातील सर्वात अगोदर शेरी बु येथील नदीला या नदीला भरपूर प्रमाणात पाणी दुथडी पाणी वाहून जात असते, त्याठिकाणी ठेकेदार अन अधिकारी यांनी भराव टाकून नळीद्वारे पाणी काढून देण्याचा घाट घातला आहे परंतु त्यातून खरोखरच आलेला पूर वाहुन जाईल का ? याचा कोणत्याही प्रकारची पडताळणी न करता पुलाच्या बाजूने भराव टाकून पर्यायी रस्ता करण्यात येत आहे परंतु ते अतिशय धोकादायक ठरू शकते, विशेषतः नदीच्या काठावर महादेव मंदिर व जिल्हा परिषद शाळा असून लहान लहान मुलं तिथं ज्ञानार्जन करीत आहेत मोठा अनर्थ होऊ शकतो म्हणून राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी यांनी यात लक्ष घालून ते काम थांबून पावसाळा संपल्यावर करण्यात यावे अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे तसेच कडा येथील कडी नदीवरील पुलाचे काम पूर्ण करून वाहतूक सुरळीत करावी. कारण मध्यंतरी अवकाळी पावसाने शेरी येथील एक छोटासा ओढ्यामुळे रस्ता वाहून गेल्याचे बातम्या आल्या होत्या सुदैवाने पोलीस प्रशासनाचे अधिकारी संतोष खेतमाळस यांच्या प्रसंगावधानाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी व वित्तहानी झाली नव्हती एका छोट्याशा ओढ्याने प्रशासनाचे हाल झाले होते तर मोठ्या मोठ्या नदीवरील पूल पाडून ते अर्धवट करून फायदा काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे , म्हणून ठेकेदारांनी अगोदर अर्धवट केलेले कडा नदीवरील पुलाचे काम पूर्ण करावे तसेच या राष्ट्रीय महामार्गावरील अतिशय धोकादायक ठरू शकतील असे छोटे छोट्या ओढ्यावर बांधलेले अर्धवट पुलाचे काम पूर्ण करावे अशी मागणी शिवसंग्राम चे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केली आहे.

### क्या हुआ तेरा वादा

**१५ जून तारीख काही दिवसावर आली असून परंतु कडा येथील कडी नदीवरील पुलाचे काम १५ जून पर्यंत पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करून देऊ असे आश्वासन देणारे इंजि.भोपळे साहेब यांना नागरीक विचारतात क्या हुआ तेरा वादा**

इंजि.भोपळे साहेब यांच्याशी संपर्क साधला असता त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही त्यामुळे त्यांची बाजु समजु शकली नाही.

## पैठण-पंढरपूर मार्गावरील चुंभळी घाटातील बिकट वाटेमुळे वाहनधारक त्रस्त

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पैठण-पंढरपूर या पालखी मार्ग रस्त्याचे गेल्या दहा वर्षापासून काम सुरू आहे. या रस्त्यावर पाटोदा तालुक्यात चुंबळी घाट रस्त्याची दुर्दशा झाली आहे.या रस्त्यावर पाऊस पडल्याने व नाली नसल्याने सर्व डोंगरातील माती व दगड रस्त्यावर जमा झाले आहेत.यामुळे हा रस्ता चढताना-उतरताना विद्यार्थी प्रवासी व वारकऱ्यांचे हाल होत आहेत.आषाढी एकादशी जवळ आल्याने या रस्त्यावर वारकरी प्रवासी यांची गर्दी आहे.या रस्त्यावरून संभाजीनगर, अहिल्यानगर, नाशिक, जळगाव



**पैठण-पाटोदा-पंढरपूर पालखी मार्गाची दुर्दशा**

येथील वारकरी सायकल, मोटरसायकल, जीपने, बैलगाडीने प्रवास करतात. वारकरी व शेतकऱ्यांना रस्त्यावर चालणे कठीण झाले आहे. रस्त्यावरचे दगड व खड्डे चुकविताना मोटरसायकल व कार वाकडे चालून विद्यार्थ्यांना वाहनधारकांना जीव मुठीत धरावा लागत आहे.या घाटात पाऊस झाल्याने डोंगरातील पाणी रस्त्यावरून वाहत आहे.रस्त्याला खड्डे व पडल्याने व खडी जमा झाल्याने मोटरसायकल घसरून पडतात तर लहान कार घाट चढताना हाल होत आहेत.प्रसंगी गाडी बंद पडून खड्ड्यात अडकतात.रस्ता अरुंद असल्याने सर्व वाहने अडकतात.तर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या रस्त्याची नाली काढून हा घाट लवकर डांबरीकरण करावा.पैठण ते पंढरपूर हा रस्ता गंगामाई तीराजवळ बोधेगाव पासून खर्डा,धाराशिव जिल्ह्यापर्यंत पूल,खड्ड्यांची व नालींची दुरुस्ती करण्यात यावी.यामुळे वारकऱ्यांना व शेतकऱ्यांना हा रस्ता शेतात तालुक्याला,जिल्ह्याला जाण्यासाठी संत एकनाथ महाराज,श्री विठ्ठल-रुक्मिणी दर्शनास श्री.माऊली, श्री क्षेत्र भगवानगड,श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड,मोहटादेवी, कुलस्वामिनी आई तुळजाभवानी दर्शनास सुलभ होऊन शासनास व त्या गुत्तेदारास आशिर्वाद लागतील.प्रसंगी अनेक विद्यार्थी या रस्त्यावरून शिक्षण मिळवतील.या रस्त्याचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी परिसरातील जनतेकडून होत आहे.

## कापूस पिकावरील शेंदरी बोंड अळीचे एकात्मिक व्यवस्थापन

**बीड । प्रतिनिधी**

शेंदरी बोंड अळी हि कापूस पिकावरील महत्वाची किड असून प्राथमिक अवस्थेत कपाशीची पाते व कोवळी बोंडे यांचे नुकसान करते तसेच परिपक्व झालेले बोंडामधील सरकी व रुईचे नुकसान करते यामुळे बियाणेची उगवणशक्ती कमी होते तसेच धाग्याची लांबी व मजबुतीही कमी होते, या किडीच्या नियंत्रणासाठी वेळीच एकात्मिक व्यवस्थापन केल्यास बोंड अळी पासून होणाऱ्या नुकसानी पासून कपाशीचे पिक वाचवू शकतो.

पेरणीपूर्व शेतकऱ्यांनी करावयाच्या उपाययोजना:- किडीच्या जिवनक्रमात अडथडा निर्माण करण्यासाठी पिकांची योग्यती फेरपालट करावी.जास्त कालावधीचे वाण शेंदरी बोंडअळीला मोठ्या प्रमाणात बळी पडतात यासाठी मध्यम व लवकर येणाऱ्या (१५० ते १८०) बीटी कपाशीच्या वाणांची लागवड करावी. शेंदरी बोंडअळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विविध संकरीत वाणांची लागवड न करता गाव निहाय एकाच वाणाची व एका वेळेस लागवड करावी. तसेच जून महिनामध्ये लागवड पूर्ण करून घ्यावी. निमयुक्त किटकनाशके तथा जैविक बुरशीनाशकांचा पाते व बोंडे धरण्याच्या अवस्थेत प्राधाण्याने वापर करावे.नत्रयुक्त खतांचा वापर जास्त झाल्यास पिकाची कायिक वाढ होऊन शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढतो म्हणून नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळून माती परीक्षण आधारावर खतांचा वापर करावा. कामगंध सापळयांचा शेतकरी बांधवांनी प्रभावीपणे वापर केल्यास त्यांच्या परीसरामध्ये शेंदरी बोंडअळीचे व्यवस्थापन करणे सोपे होईल.

जिनिंग व प्रेसिंग मिल तसेच कापूस व्यापारी यांनी करावयाच्या उपाययोजना :-शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव हा कापूस संकलन केंदे, कापूस साठवनुक केंदे व जिनींग फॅक्टरीमधे साठवलेला कापूस तसेच सरकी मधून होण्याची शक्यता जास्त असते. जिनिंग प्रेसिंग मध्ये साठवलेल्या कापूस व सरकी मध्ये जर बोंड अळीची अंडी व कोष शिल्लक राहून गेले असतील तर पोषक वातावरण मिळताच त्यांचे जीवनचक्र गतिमान होते. या किडीच्या अवस्था जसे अळी, कोश आणि पतंग कापसाच्या मिल मध्ये आढळून येतात. यामुळे याठिकाणी ही कीड नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. जिनींग मिल परीसरात किमान ५ कामगंध सापळे जिनींग मिलमध्ये लावावेत.

# पेरणी पूर्वी बीजप्रक्रिया जरूर करा

**बीड । प्रतिनिधी**

विविध कीड-रोगांच्या नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीजप्रक्रिया अत्यंत महत्त्वाची आहे. विविध पिकांमध्ये बियाणे आणि जमिनीच्या माध्यमातून कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. प्रादुर्भाव टाळण्यासाठी एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीमध्ये बीजप्रक्रियेचा देखील समावेश होतो. त्यासाठी पेरणीपूर्वी शिफारशीनुसार प्रत्येक पिकाच्या बियाणास बीजप्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. बीजप्रक्रियेचे महत्त्व बियाण्याची उगवण क्षमता वाढते, रोपांची सतेज व जोमदार वाढ होते.रासायनिक खतांची २० ते २५ टक्के बचत होते.जमिनीतून व बियाण्यांद्वारे पसरणाऱ्या रोगांचा प्रादुर्भाव टाळता येतो.पीक उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ मिळते.

घ्यावयाची काळजी.बीजप्रक्रिया करणाऱ्या व्यक्तीने हातामध्ये हातमोजे किंवा प्लॅस्टिक पिशवीचा वापर करावा. जेणेकरून रासायनिक घटकांचा हातासोबत संपर्क होणार नाही. तोंडावर कापड किंवा मास्क लावावा.बीजप्रक्रियेवेळी बुरशीनाशके



जिवाणू खतामध्ये मिसळू नयेत.विकत घेतलेल्या बियाणांवर बुरशीनाशक आणि कीटकनाशकांची बीजप्रक्रिया केली असल्यास अशा बियाणांवर फक्त जिवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी.बीजप्रक्रिया केलेले आणि पेरणीनंतर शिल्लक राहिलेले बियाणे जनावरांच्या किंवा मानवी खाण्यात येणार नाही याची काळजी घ्यावी.जिवाणू खत शक्यतो त्याच हंगामात वापरावे. शिल्लक राहिलेले असल्यास, ते सहा महिन्यांच्या आत वापरावे. त्याची साठवणूक थंड जागेत करावी. बीजप्रक्रिया करताना तंबाखू खाणे, पाणी पिणे, सिगारेट ओढणे टाळावे. भुईमूग, सोयाबीन इ. पातळ आवरण (साल) असलेल्या पिकांच्या बियाणाला बीजप्रक्रिया करताना जिवाणू संवर्धक किंवा बुरशीनाशकांचे घट्ट द्रावण करावे. बीजप्रक्रिया करताना टरफल निघणार नाही याची विशेष काळजी घ्यावी.

पीकनिहाय शिफारशीत बीजप्रक्रिया.सोयाबीन कार्बोक्झीन (३७.५ टक्के) अधिक थायरम (३७.५ टक्के) (संयुक्त बुरशीनाशक) ३ ग्रॅम.त्यानंतर थायामेथोक्झाम (३० टक्के एफएस) १० मिलि.रायझोबियम अधिक स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खत (पीएसबी) २५ ग्रॅम. किंवा १० मिली प्रती किलो बियाणे. तूर कार्बोक्झीन (३७.५ टक्के) अधिक थायरम (३७.५ टक्के) (संयुक्त बुरशीनाशक) ३ ग्रॅम.बायोमिक्स/ट्रायकोडर्मा १० मिली प्रती किलो बियाणे, रायझोबियम अधिक स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खत (पीएसबी) २५, ग्रॅम मूग उडिद ट्रायकोडर्मा ५ ग्रॅम प्रती किलो बियाणे रायझोबियम अधिक स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खत (पीएसबी) २५ ग्रॅम. प्रती किलो बियाणे.बाजरी३ किलो मीठ १० लिटर पाण्यात मिसळून या द्रावणात बी टाकावे. द्रावणावर तरंगणारे बी बाहेर काढून जाळून नष्ट करावे. तळाला राहिलेले बी काढून तीन वेळा स्वच्छ पाण्याने धुवून सावलीत सुकवावे.मेटॅलॅक्झील एम (३१.८ % इ.ए) २.४ मिली. मका थायरम ४० % एफएस.२.४ ग्रॅम. किंवा थायरम ७५ % डब्ल्यूएस.३ ग्रॅम. प्रती किलो बियाणे.

अ‍ॅझोटोबॅक्टर व पी.एस.बी. जिवाणू प्रत्येकी २५ ग्रॅम प्रती किलो बियाणे अर्धा तास सावलीत सुकवून नंतर पेरणी करावी.

खरिप ज्वारी :-दहा लिटर पाण्यामध्ये ३ किलो मीठ मिसळून द्रावण तयार करून त्यात बियाणे टाकावे. द्रावणावर तरंगणारे बी बाहेर काढून जाळून नष्ट करावे. पाण्याच्या तळाला राहिलेले बी हाताने काढून घ्यावे. हे बी ३ वेळा स्वच्छ पाण्याने धुवून नंतर सावलीत वाळवावे. गंधक (३०० मेश) ४ ग्रॅम किंवा थायरम ७५ % ३ ग्रॅम. प्रती किलो, इमिडाक्लोप्रीड ७० डब्ल्यूएस.७ ग्रॅम. प्रती किलो बियाणे.अ‍ॅझोटोबॅक्टर व पी.एस.बी. जिवाणू प्रत्येकी २५ ग्रॅम प्रती किलो, बियाणे अर्धा तास सावलीत सुकवून नंतर पेरणी करावी.भुईमुग कार्बोक्झीन (३७.५ टक्के) अधिक थायरम (३७.५ टक्के) (संयुक्त बुरशीनाशक) ३ ग्रॅम.रायझोबियम अधिक स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खत (पीएसबी) २५ ग्रॅम. किंवा १० मिली प्रती किलो बियाणे. पिक निहाय शिफारशीप्रमाणे बीज प्रक्रिया करूनच पेरणी करावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

पान १वरून...

### कुमशीतील शेतकरी करणार

खर्च शून्यावर येतो व जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते या धर्तीवर कुमशी येथील शेतकरी शंभर एकर क्षेत्रावर हा प्रयोग करत आहेत याला कृषी पर्यवेक्षक प्रशांत नाळपे व कृषी सहाय्यक आर एम बोत्रे मार्गदर्शन करत आहेत यामध्ये प्रकाश करपे गोवर्धन ढोरमारे शिवाजी निकम व गावातील अनेक शेतकरी सहभागी आहेत तरी तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या तंत्राचा वापर करून जमिनीची सुपीकता वाढविण्याचे आवाहन तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे यांनी केले आहे.

### दोन दिवसात मनोज जरांगे

मनोज जरांगे पाटील हे गेले आठ जून पासून आन्न पाणी न घेता कठोर उपोषणाला बसले आहेत.त्यांची तब्येत दिवसेंदिवस खालावत चालली आहे.त्यांच्या आंदोलनाची कसल्याही प्रकारे सरकार दखल घेत नाही.या आंदोलनाकडे सरकार नुसती बघ्याची भूमिका घेत आहे.परंतु सकल मराठा समाजाला पाटलांची ही हाल अपेस्टा सहन होऊ शकत नाही.येत्या दोन दिवसांमध्ये त्रिमूर्ती सरकारने मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास वडवणी तालुक्यात तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सकला मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीनेदेण्यात आला आहे.

cmyk

# वादळी पावसाचा नंदुरबाला मोठा फटका

## केळीच्या बागा जमिनदोस्त, अद्याप पंचनामे नाहीत

राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. काही भागात वादळी पावसामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. तर काही भागात शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. दरम्यान, नंदुरबार जिल्ह्यात देखील वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाचा मोठा फटका शेती पिकांना बसला आहे. अनेक ठिकाणी केळीच्या बागा जमिनदोस्त झाल्या आहेत. याचा शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.

प्रशासनाच्या वतीनं अद्याप पंचनाम नाहीत

नंदुरबार जिल्ह्यातील शहादा तालुक्यात आलेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसामुळे शेतीचे अतोनात नुकसान झालं आहे. ब्राह्मणपुरी, सुलवाडा ,पिंपरी शिवारात केळी पिकांचं मोठं नुकसान झालं आहे. मधुकर पाटील या शेतकऱ्यांचे एकूण ८ हजारपेक्षा अधिक केळीची झाडे जमिनदोस्त झाली आहेत. अचानक आलेल्या वादळी वाऱ्यामुळे केळीची बाग आडवी झाली आहे. दरम्यान, अद्यापही प्रशासनाच्या वतीने कोणत्याही प्रकारचे पंचनामे केले नाहीत. यामुळं शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

६ जूनला मान्सूनचे राज्यात आगमन

सध्या मान्सून राज्यात दाखल झाला आहे. ६



जूनला मान्सूनचे राज्यात आगमन झाले असले तरी अद्याप संपूर्ण राज्यात मान्सून सक्रीय झाला नाही. हळूहळू मान्सन सक्रिय होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. मान्सून सुरुवातीला कोकणात दाखल झाला. त्यानंतर मुंबईत दाखल झाला आहे. दरम्यान, सध्या राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. याचा शती पिकांना फटका बसत आहे.

---

# २ दिवस थांबा, सगळं सरळ करु!

**शेतकऱ्यांच्या प्रश्नावरुन शरद पवारांचा निशाणा**



आचारसंहिता असल्याचे कारण देत शेतकऱ्यांना मदत मिळत नसल्याचे काही शेतकऱ्यांनी शरद पवार यांनी सांगितले. यावर शरद पवार यांनी दोन दिवस थांबा, सगळं सरळ करु असे वक्तव्य केलं आहे. यावेळी बोलताना शरद पवारांनी सत्ताधाऱ्यांवर टीकाही केली. चंद्राबाबू नायडू आणि नितिश कुमार नसते तर यांचं सरकार बनलं नसतं. डोक्यात हवा गेली अणि पाय जमिनीवर राहिले नाहीत की, या देशातील जनता योग्य वेळी योग्य निर्णय घेते हे लोकांनी दाखवून दिल्याचे शरद पवार म्हणाले.

माझ्यासह सोनिया गांधी आणि इतर मित्रपक्षांनी ठरवलं आहे, की लोकांसाठी एकत्र काम करायचे आहे असे शरद पवार म्हणाले. शरद पवार यांनी आद वाल्हे गावातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. आता जो पाऊस पडतोय तो अपुरा आहे. त्याने प्रश्न सुटत नाही. या भागासाठी गुंजवणी पाणीपुरवठा योजना पुर्ण होणे आवश्यक असल्याचे शरद पवार म्हणाले. त्यासाठी राज्य सरकारने निधी द्यावा असेही पवार म्हणाले. या प्रकल्पाची सुरुवात माझ्या सहीने झाली आहे. पण पुढे कालव्यांची कामे झाली नाहीत. मी हा प्रश्न सोडवण्यासाठी मुख्यमंत्री आणि जलसंपदा मंत्री यांच्यासोबत बैठक घेण्यास तयार असल्याचे शरद पवार म्हणाले. ही बैठक पुण्यात होईल किंवा मुख्यमंत्री म्हणतील तिथे मी जायला तयार असल्याचे पवार म्हणाले.

देशाचं राजकारण बदलत आहे. मोदींच्या मनात समाजातील काही घटकांबद्दल आकस असल्याचे शरद पवार म्हणाले. मोदींनी भाषणातून समाजात दुही निर्माण केली आहे. मी गेली ५६ वर्षे एकही दिवस खाडा न जाता लोकप्रतिनिधी म्हणून काम करतोय. या काळात अनेक पंतप्रधान पाहिले. काहींसोबत कामही केलं. अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह अनेकांनी देशाचे हित पाहीलं. पण सध्याची परिस्थिती वेगळी असल्याचे म्हणत शरद पवारांनी भाजपवर टीका केली.

# उजनी धरण १०० टक्के भरणार; हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वर्तवला अंदाज


पंढरपूर : यंदा शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. यंदा उजनी धरण १०० टक्के भरणार आहे, असा दावा हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी केला आहे. मागील वर्षी सोलापूर जिल्ह्यात दुष्काळ पडला होता. मात्र यंदा सोलापूर जिल्ह्यात जून महिन्याच्या सुरुवातीपासूनच जोरदार पावसाला सुरुवात झाली आहे. या पावसाळ्यात यंदा उजनी धरण १०० टक्के भरणार असून धाराशिवपासून पुणे, सांगलीपर्यंत दुष्काळी पट्ट्यात चांगला पाऊस पडेल, असं भाकीत हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी केलं आहे. महत्त्वाचं म्हणजे याआधी उजणी धरण २०२१ मध्ये १०० टक्के भरलं होतं.

उजनी धरण १०० टक्के भरणार

हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी वर्षभरातील पावसाचा अंदाज मांडला आहे. यावेळी त्यांनी सांगितलं की, ११ ते १४ जून दरम्यान सोलापूर, अहिल्यानगर, सांगली, सातारा, धाराशिव जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडणार असल्याचा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. याशिवाय. यंदा जूनमध्येच सर्वाधिक पाऊस असेल, असंही त्यांनी सांगितलं आहे.

हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वर्तवला अंदाज

जून पेक्षा जुलै महिन्यामध्ये पावसाचा जोर पाऊस असेल तर ऑगस्ट महिन्यात पावसाचं प्रमाण कमी असेल. तसेच सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात सुद्धा कमी पाऊस पडेल, असा अंदाजही डख यांनी वर्तवला आहे. दरम्यान, ५ नोव्हेंबरपासून मान्सून देशातून माघारी फिरेल असं भाकीतही त्यांनी केलं आहे.



उजनीची पाणी पातळी दोन टक्क्यांनी वाढली : उजनी धरण पाणलोट क्षेत्रात १ जूनपासून ७५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. यामुळे उजनी धरणाची पाणी पातळी दोन टक्क्यांनी वाढली आहे. तसेच १.०१२ टीएमसी पाणीसाठा वाढला आहे. भीमा आणि नीरा खोऱ्यातील पाणलोट क्षेत्रात पडलेल्या दमदार पावसामुळे भीमा खोऱ्यातील उजनीवरील १८ धरणांत दमदार पावसाने हजेरी लावली. जूनच्या पहिल्या आठवड्यात उजनी धरणाची पाणी पातळी वाढू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचं वातावरण आहे.

एक महिना अगोदर दौंड येथून विसर्ग

गेल्या वर्षी २६ जून रोजी उजनी पाणलोट क्षेत्रात २१ मिमी पाऊस झाला होता. एकूण ४६१ मिमी पावसाची नोंद झाली होती. तर दौंड येथून उजनी धरणात ११ जुलैपासून पाणी येण्यास सुरुवात झाली होती. यावर्षी एक महिना अगोदर दौंड येथून विसर्ग सुरू झाल्याने सोलापूर, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण आहे. नीरा खोऱ्यातील गुंजवणी, नीरा देवधर, नीरा, भाटघर या धरण क्षेत्रात दमदार पावसाचं आगमन झालं आहे.

---


# हृदयाच्या आकाराच्या अँथुरियम फुलांच्या लागवडीतून होते लाखोंची कमाई

हृदयाच्या आकाराच्या अँथुरियम फ्लॉवरची लागवड केल्याने कमाईची उत्तम संधी मिळू शकते कारण त्याला विशेष प्रसंगी आणि सजावटीसाठी मागणी असते. आकर्षक रंग आणि ताजेपणा दीर्घकाळ टिकवून ठेवल्यामुळे हे फूल फुलविक्रेते आणि डेकोरेटर्समध्ये खूप लोकप्रिय आहे. त्याची वाढती मागणी आणि उच्च बाजारभाव यामुळे तुम्ही याच्या लागवडीतून लाखोंची कमाई करू शकता.

जागतिक बाजारपेठेत कट फ्लॉवर्सची बाजारपेठ झपाट्याने वाढत आहे. आजकाल, भारतातील महानगरांमध्ये मिठाईच्या बॉक्सपेक्षा आयात केलेली फुले चांगली भेट मानली जात आहेत कारण विशेष प्रसंगी, समारंभ, पार्टी आणि रिसेप्शनसाठी कट फ्लॉवरची उपयुक्तता झपाट्याने वाढली आहे. असा अंदाज आहे की सन २०२४ मध्ये कट फ्लॉवरची जागतिक बाजारपेठ ३९५९ कोटी अमेरिकन डॉलर्सची असेल आणि २०३२ पर्यंत ती सुमारे ५३९० कोटी अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. अशा फुलांच्या यादीत अँथुरियम पहिल्या क्रमांकावर आहे, ज्याची लागवड करून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळू शकते.

भारतात फ्लॉवर मार्केट मजबूत : देशातील फुलांची वार्षिक देशांतर्गत मागणी दरवर्षी २५ टक्क्यांनी वाढत आहे. भारतीय फुलांची बाजारपेठ २६२ अब्ज रुपयांहून अधिक आहे, जी दरवर्षी वाढत आहे. या आंतरराष्ट्रीय फुलांच्या बाजारपेठेत भारताची उपस्थिती लक्षणीय आहे. आपल्या देशातून सुमारे २२ हजार मेट्रिक टन फुले परदेशात निर्यात केली जातात, ज्यातून सुमारे ७०७.८१ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळते. आधुनिक फुलांमध्ये यापैकी निम्म्याहून अधिक वाटा आहे. फ्लॉवर मार्केट इतक्या झपाट्याने वाढत असताना, फुलशेतीमधील तुमचे भविष्य नक्कीच आकाशाला भिडणार आहे. यामध्ये अत्याधुनिक आणि महागड्या फुलांची शेती तुम्हाला अधिक आर्थिक बळ देईल.

अँथुरियम २५ दिवस ताजे राहते : सामान्यतः कापलेल्या फुलांमध्ये डच रोझ, जरबेरा, ऑर्किड, लिली, क्रायसॅन्थेमम, कार्नेशन आणि इतर अनेक फुलांचा समावेश होतो परंतु आज ग्राहकोपयोगी



वस्तूंची मोठी बाजारपेठ ऑनलाइन झाली आहे. ऑनलाइन भेटवस्तू पाठवण्याचे हे युग आहे आणि भेटवस्तू म्हणून फुलांपेक्षा चांगले काय असू शकते, परंतु येथे एक समस्या होती, सर्वोत्तम फुले देखील रोपातून तोडल्यानंतर ४-५ दिवसात कोमेजतात. जसे झेंडू १-२ दिवस टिकते, डच गुलाब ३-४ दिवस टिकते, त्याचप्रमाणे आधुनिक फूल ग्लॅडिओलस देखील सामान्य परिस्थितीत केवळ ४-५ दिवस टिकते. परंतु अँथुरियम हे विदेशी फूल ताजे राहते, कारण सामान्य परिस्थितीतही ते २०-२५ दिवस आपले सौंदर्य पसरवत असते. या महागड्या आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या फुलांच्या लागवडीमुळे तुमच्या उत्पन्नात नक्कीच वाढ होईल.

अँथुरियमची लागवड : अँथुरियमच्या फुलांच्या सौंदर्यामुळे आणि त्याच्या सुंदर वनस्पतीमुळे, ते कट फ्लॉवर म्हणून आणि कुंडीत वाढण्यास अतिशय योग्य मानले जाते. भारतात, केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांमध्ये ते मुबलक प्रमाणात घेतले जाते. ही हृदयाच्या आकाराची फुले लाल, गुलाबी, पांढरी, नारिंगी आणि मलई रंगात फुलतात. अँथुरियम ही सावली देणारी वनस्पती आहे. मोकळ्या ठिकाणी जेथे सावली असते तेथे झाडाची वाढ व विकास चांगला होतो. ७५ टक्के शेड नेट वापरून मोकळ्या जागेत त्याची चांगली लागवड करता येते. ८० टक्के आर्द्रता आणि २५-२८ अंश तापमान असल्यास फुलांचे उत्पादन चांगले मिळते. अँथुरियमच्या वाढीसाठी, मातीच्या मिश्रणाचे माध्यम योग्य असावे ज्यामध्ये हवेचा प्रवाह चांगला असेल आणि ज्यामध्ये अधिक जलसंधारण असेल. त्याच्या मिश्रणात कोळसा, नारळाची साल, झाडाची साल, तांदळाची भुसी, कोको पीट, वाळू, वीट, पानांचे खत, कडुलिंबाची पेंड यांचे मिश्रण वापरले जाते. या मिश्रणाचा मूल्य ५.७ ते ६.२ दरम्यान ठेवले आहे.

अँथुरियमचे प्रकार : लाल प्रकार - मिकी माऊस, चार्मी, इंटी, टोटोरा, ओसाकी, कोजोहरा, कुमाना, टोयामो, रिओ, प्रॉन्टी, मिरजम आणि इंग्रिड.

ऑरेंज प्रकार - नीता, सनबर्स्ट, डायमंड ज्युबिली, हवाई, फ्ला ऑरेंज, अवोगिंगो, हॉर्निंग ऑरेंज आणि हॉर्निंग रूविन.

पांढऱ्या जातींमध्ये - मेनोआ मिस्ट, कार्मेलॉन, पर्ल, कोटोपॅक्सी, एक्रोपोलिस, जमैका, मरून मुनी, लिमा, जिसा आणि क्यूबी अब पीक, ब्लस, मेरिमन, कँडी स्ट्राइप, एव्हो एन्की, हॉनिटी, सरप्राइज, व्हिटनी सरिना, लुंटी, लेडी जानी आणि पॅराडाइज पिंक.

झाड कसे लावायचे? : त्याची झाडे बियाणे, कलमे आणि टिश्यू कल्चरपासून तयार केली जातात, ज्यामध्ये टिश्यू कल्चरपासून तयार केलेली झाडे रोगमुक्त असतात आणि लवकर फुले येतात. म्हणून, व्यावसायिक शेतीसाठी, टिश्यू कल्चरपासून तयार केलेली झाडे लावणे चांगले. नवीन रोपे कुंडीत किंवा बेडमध्ये लावली जातात. ३० सें.मी मातीच्या मिश्रणाने भरलेल्या भांड्यात रोप लावले जाते. शेडनेटचा वापर व्यावसायिक शेतीसाठी केला जातो ज्यामध्ये पावसाळ्यासारख्या दमट हवामानात ३० बाय ३० किंवा ४० बाय ४० सेंटीमीटर अंतरावर वाढलेल्या बेडमध्ये रोपे लावणे चांगले.

केव्हा सिंचन करावे : उन्हाळ्यात, झाडांना सकाळी आणि संध्याकाळी हलके पाणी द्यावे. हिवाळ्यात गरजेनुसार दिवसातून एकदा पाणी द्यावे. जास्त पाणी दिल्याने झाडाचे नुकसान होते आणि रोग होण्याची शक्यता असते. सिंचनासोबत खत व खते दिल्यास झाडांना फायदा होतो. एन्थुरियमला वाढीसाठी आणि फुलांच्या उत्पादनासाठी संतुलित प्रमाणात खताची आवश्यकता असते. दरवर्षी २००-२५० किलो नायट्रोजन, २००-१५० किलो स्फुरद आणि २५०-३०० किलो पोटॅश प्रति हेक्टर जमिनीत मिसळावे. सूक्ष्म अन्नद्रव्ये हेक्टरी १० किलो या प्रमाणात जमिनीत मिसळावीत. त्यामुळे फुले चांगली येतात आणि झाडे चांगली वाढतात. सिंचनासोबत खते द्यायची असल्यास ८ किलो नत्र, १२ किलो स्फुरद आणि २४ किलो पोटॅश २०० ग्रॅम, पोटॅशियम सल्फेट २० ग्रॅम, मॅग्नेशियम सल्फेट ४० ग्रॅम १०० मिली लिटर पाण्यात मिसळून मिसळावे. दिवसातून दोनदा पाणी द्यावे. आठवड्यातून एकदा कॅल्शियम नायट्रेट अर्धा ग्रॅम प्रति लिटर पाण्यात विरघळवून झाडाला द्यावे.

---

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६६५ : शिवाजीमहाराजांनी राजा जयसिंगची भेट घेऊन त्यांच्याबरोबर सलोख्याची बोलणी करण्यासाठी त्याच्या शिबिरामध्ये प्रवेश केला.

१७७६ : अमेरिका देशाला स्वातंत्र्य घोषित करण्यासाठी घोषणापत्र तयार करण्यासाठी समितीची स्थापना करण्यात आली.

१८६६ : अलाहाबाद उच्च न्यायालयाची स्थापना.

१८९५ : पॅरिस-बॉर्डोक्स-पॅरिस ही इतिहासातील पहिली ऑटोमोबाईल रेस किंवा पहिली मोटर रेस झाली.

१९०१ : न्यूझीलंडने कूक बेटे बळकावली.

१९०७ : नॉर्थनम्प्टनशायर क्रिकेट संघ १२ धावांत सर्वबाद.

१९२१ : ब्राझील देशांतील महिलांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला.

१९३५ : एडविन आर्मस्ट्राँगने पहिल्यांदा एफ.एम. लहरींचे प्रसारण केले.

१९३७ : जोसेफ स्टालिनने आपल्याच ८ लष्करी अधिकार्यांना ठार केले.

१९५५ : जगातील पहिल्या मैग्नेशियम जेट विमानाने भरारी घेतली.

१९६४ : पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थ्या संपूर्ण देशभर विसर्जित करण्यात आल्या.

१९७० : ॲनामे हेस, एलिझाबेथ पी. हॉइसिंग्टन या अमेरिकन सैन्यातील पहिल्या स्त्री जनरल झाल्या.

१९७२ : दारू पिउन रेल्वे चालवल्यामुळे एल्थाम वेल हॉल येथे रेल्वे अपघात होऊन ६ जण ठार व १२६ जण जखमी झाले.

१९९७ : सुखोई-३०के ही रशियन बनावटीची विमाने भारतीय हवाई दलात दाखल.

१९९८ : कॉम्पॅक कॉम्पुटर कंपनी ने डिजिटल एक्विपमेंट कॉर्पोरेशन विकत घेण्यासाठी ९ अब्ज अमेरिकी डॉलर मध्ये इतिहासातील सर्वात मोठा सौदा केला.

१९८७ : १६० वर्षाच्या कालखंडात ब्रिटीश देशाच्या पंतप्रधान पदावर सलग तिसऱ्यांदा विराजमान होणाऱ्या पंतप्रधान मार्गारेट थॅचर या पहिल्या ब्रिटीश नागरिक ठरल्या.

२००४ : कॅसिनी-हायगेन्स अंतराळयान शनिचा उपग्रह फीबी जवळून गेले.

२००७ : बांगलादेशातील चितगावमध्ये भूस्खलनामुळे १३० लोक ठार झाले.

२००८ : भ्रष्ट्राचाराच्या आरोपाखाली तुरुंगात कैद असलेल्या बांगलादेशाच्या पूर्व पंतप्रधान शेख हसीन वाजेद यांची सुटका करण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१५ : भारतीय-श्रीलंकन छायाचित्रकार जुलिया मार्गारेट कॅमेरॉन यांचा जन्म. (मृत्यू: २६ जानेवारी १८७९)

१८८० : अमेरिकेचे पहिले संसद सदस्य रैफिन यांचा जन्मदिन.

१८९४ : टोयोटा मोटर कंपनीचे संस्थापक काइचिरो टोयोडा यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९५२)

१८९७ : क्रांतिकारक रामप्रसाद बिस्मिल यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)

१९०९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश व राजकारणी तसचं, निट्टे एज्युकेशन ट्रस्टचे संस्थापक के.एस. हेगडे यांचा जन्मदिन.

१९२४ : साली भारतीय व्यंगचित्रकार, पत्रकार आणि लेखक अत्तुपुरथू मॅथ्यू अब्राहम उर्फ अबू अब्राहम यांचा जन्मदिन.

१९३७ : साली पद्मभूषण व संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नर्तक, नृत्यदिग्दर्शक आणि शैक्षणिक तसचं, नालंदा नृत्य संशोधन केंद्राच्या संस्थापक-दिग्दर्शिका आणि मुंबईतील नालंदा नृत्य कला महाविद्यालयाच्या संस्थापक-प्राचार्या कनक रेले यांचा जन्मदिन.

१९४२ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय उत्प्रेरक वैज्ञानिक, आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे माजी संचालक पॉल रत्नसामी यांचा जन्मदिन.

१९४८ : बिहारचे मुख्यमंत्री लालूप्रसाद यादव यांचा जन्म.

१९८२ : टंबलर चे सहसंस्थापक मार्को आर्मेंट यांचा जन्म.

१९८९ : भारतीय पॅरा-बॅडमिंटनपटू मानसी गिरीशचंद्र जोशी यांचा जन्मदिन.

१९९० : साली अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय हॉकी पटू सविता पुनिया यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

३२३ई.पुर्व : मॅसेडोनियाचा राजा अलेक्झांडर द ग्रेट यांचे निधन. (जन्म: २० जुलै ख्रिस्त पूर्व ३५६)

१७२७ : इंग्लंडचा राजा जॉर्ज (पहिला) यांचे निधन. (जन्म: २८ मे १६६०)

१९०३ : सर्बियाचा अलेक्झांडर (पहिला) यांची सर्बियन पत्नी ड्रगा माशिन यांचे निधन. (जन्म: ११ सप्टेंबर १८६४)

१९२४ : इतिहासाचार्य, लेखक, नाटककार व कवी वासुदेव वामन तथा वासुदेवशास्त्री खरे यांचे निधन. (जन्म: ५ ऑगस्ट १८५८)

१९५० : प्रसिद्ध महाराष्ट्रीयन मराठी भाषिक लेखक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि स्वातंत्र्यसेनानी तसचं, भारतीय राष्ट्रीय शिक्षक म्हणून ओळखले लोकप्रिय असणारे पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी यांचे निधन.

१९८३ : घन:श्याम बिर्ला, भारतीय उद्योगपती. (जन्म: १० एप्रिल १८९४)

१९९७ : भारतीय सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार पद्मश्री व पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय दूर अंतरीय जलतरणपटू आणि व्यावसायिक तसचं, इग्लिश खाडी पार करणारे पहिले भारतीय नागरिक मिहीर सेन यांचे निधन. (जन्म: १६ नोव्हेंबर १९३०)

२००० : राजेश पायलट, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री. (जन्म: १० फेब्रुवारी १९४५)

# बालकामगार मुक्त बीड जिल्ह्यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे




## डॉ.विक्रम सारुक यांचे प्रतिपादन; बालकामगार प्रथा विरोधी दिनानिमित्त रॅली

बीड । प्रतिनिधी

१२ जुन जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनानिमित्त बीड शहरात महाराष्ट्र लोकविकास मंच, श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला ता केज, बालहक्क संरक्षण कृती समिती बीड, एआयएम ट्रस्ट, पसायदान सेवा प्रकल्प ढेकनमोह व सरकारी कामगार अधिकारी कार्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने बालकामगार प्रथा विरोधी रॅलीचे बीड शहरात आयोजन करण्यात आले होते.




रॅलीच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ विक्रम सारुक, प्राचार्य जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी काकडे साहेब माजी बालकल्याण समिती अध्यक्ष दत्ताजी नलावडे, सरकारी कामगार अधिकारी कार्यालयातील माथाडी कामगार अधिकारी शेखर कानडे साहेब, काशीद साहेब,पसायदान सेवा प्रकल्पाचे गोवर्धन दराडे, एआयएम ट्रस्टचे जिल्हा समन्वयक ओमप्रकाश गिरी, महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक तथा बालहक्क कार्यकर्ते बाजीरावजी ढाकणे, बालहक्क संरक्षण कृती समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष गणेशजी जाधव, बाजीराव गिरी यांची प्रमुख उपस्थिती होती. उद्घाटन प्रसंगी डॉ विक्रम सारूक यांनी बालमजुरी हा समाजाला लागलेला कलंक असून तो पुसण्यासाठी शासन, प्रशासन, सामाजिक संस्था व सजग नागरिकांनी प्रयत्न करून प्रत्येक बालकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात दाखल करावे. यासाठी सर्व स्तरातून प्रयत्न होणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन केले. जनजागृती रॅली जिल्हा परिषदेपासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे मार्गस्थ झाली. समारोप प्रसंगी दत्ता नलावडे यांनी प्रत्येक बालकांना त्यांचे हक्क देण्याचे काम आपल्या सर्वांचे आहे त्यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे,बालकामगार प्रथा नष्ट करण्यासाठी व्यापक प्रयत्न होणे गरजेचे आहेत. बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या मुलांचे शिक्षण, वीट भट्टी कामगारांच्या मुलांचे शिक्षण याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन केले. १२ जून जागतिक बालकामगार प्रथा विरोधी दिनाचे औचित्य साधून महाजनवाडीचे सरपंच विश्वंभर गिरी यांनी बालकामगार मुक्त महाजनवाडी करण्याचा संकल्प केला. रॅलीच्या समारोपानंतर बालहक्क संरक्षण कृती समितीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. रॅलीच्या यशस्वीतेसाठी महाराष्ट्र लोकविकास मंच, श्री तुळजाभवानी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था जोला ता केज व बालहक्क संरक्षण कृती समितीचे मनीषा स्वामी, नेहा माळी , अजय लव्हाळे , गजानन रेणुके, उबाळे चव्हाण यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांचे आभार बाजीराव ढाकणे यांनी मानले.

## अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी सीईओ निता अंधारे विरोधात तक्रारीची दखल

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज प्रकरणी कारवाई न करता स्ट्रक्चरल ऑडिटच्या नावाखाली होर्डिंग्जला वैध ठरवत अनेक वर्षांपासून पालिकेचा कर बुडवणा-या होर्डिंग्ज धारकांची पाठराखण करत उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमानना करणा-या मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केल्यानंतर त्याची दखल घेऊन सुवर्णा ओगले -शिंदे सहा.आयुक्त(गट -अ) नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांनी सह आयुक्त, उपायुक्त नगर परिषद प्रशासन शाखा विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना सदर प्रकरणाची आपल्या स्तरावरून शहानिशा करून उचित कार्यवाही करण्यात यावी.तसेच केलेल्या कार्यवाहीची एक प्रत संचलनयास तात्काळ सादर करण्यात यावी असे नमुद केले आहे.

मुंबईच्या घाटकोपर येथील होर्डिंगजच्या दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचनालय मुंबई यांनी बीड नगरपरीषदेला शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे आदेश दिले होते.तसेच २४ तासात न हटवल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.परंतु सीईओ नगर परिषद बीड निता अंधारेंकडुन बीड शहरातील ९० अनाधिकृत होर्डिंग्ज त्यापैकी १९ होर्डिंग्ज सार्वजनिक ठिकाणी आणि ७१ होर्डिंग्ज घर,ईमारतीवर लावण्यात आल्याचे आढळून आले असुन यापैकी एकाही होर्डिंग्जला नगरषरीषदेची परवानगी नाही. त्यामुळे आजपर्यंत शासनाचा लाखो रूपयांचा कर बुडाला आहे.मात्र संबंधित प्रकरणात कारवाई करण्याऐवजी कर अधीक्षक बीड नगर पालिका विश्वंभर तिडके हे सीईओ नीता अंधारे यांच्या सांगण्यावरून स्ट्रक्चरल ऑडिट करून त्यांना अधिकृत करण्याचा घाट घातला आहे.जवळपास १० वर्षापेक्षाही आधिक काळ बीड शहरातील सोनाजी रमेश, निळकंठ कुलकर्णी , शेख हबीब, राम सवासे ,शुभम कोतवाल या ५ लोकांच्या अनाधिकृत होर्डिंग्जची पाठराखण करताना दिसत आहे. यापाठिमागे मोठ्या प्रमाणावर आर्थिक साटेलोटे असल्याचे बोलले जात आहे.

## थोडक्यात



### निष्काळजीपणा करणाऱ्यांना ब्लॅक लिस्ट करा-आ. सोळंके

धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील जल जीवन योजने अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांची आढावा बैठक आमदार प्रकाश सोळंके यांनी पंचायत समिती धारूर येथे घेतली.जल जीवन ची कामे वेळेत व दर्जेदार करण्याच्या सूचना आमदार प्रकाश सोळंके यांनी कर्मच्यार्याना दिल्या. आज धारूर मध्ये घेण्यात आलेल्या जलजीवन मिशन योजनेच्या आढावा बैठकीत हलगर्जीपणा आणि बेजबादारपणामुळे कामात दिरंगाई करणाऱ्या कंपन्या ब्लॅक लिस्ट कराव्या आणि योग्य ती कारवाई करून विहित कालमर्यादेत काम न केल्यास दंड आकारण्यात यावा या महत्वाच्या सूचना बैठकांमध्ये करण्यात आल्या.योजना सुरू असलेल्या गावातील नागरिकांनी सजगतेने आणि जागरूक राहून काम पूर्ण करून घ्यावे असे आवाहन यावेळी केले.

### व्याज सवलतीचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा-जाधव

धारूर । प्रतिनिधी



सध्या सेवा सोसायटी मार्फत वाटप केल्या गेलेल्या कर्जाचे नुतनिकरण सूरु असुन शेतकऱ्यांनी वेळेवर कर्जाचे नुतणीकरण करून शासनाच्या व्याज सवलतीचा लाभ घ्यावा आसे अवाहण धारूर सेवा सोसायटीचे चेअरमण बालासाहेब जाधव यांनी केले आहे. वेळेवर कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा रु.तीन लाखापर्यंतच्या व्याजाचा भार राज्य सरकारच्या व केंद्र सरकारच्या वतीने उचलला जातो.शेतकऱ्यांनी नुतणिकरण केले नाहीतर ते व्याज शेतकऱ्यांना भरावे लागते.शेतकऱ्यांनी आपल्या कर्जाचे नुतणिकरण वेळेवर करून होणारे नुकसान टाळावे असेही कळकळीचे अवाहण बालासाहेब जाधव यांनी केले आहे

### माजी सैनिक अर्जुन वाघमारे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



सेवानिवृत्त मिलिट्री मॅन अर्जुन राजाराम वाघमारे वय ८२ यांचे दिनांक ११ जुन २०२४ रोजी पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचारांना निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं दोन मुली सुना नातवंडे असा भरगच्च परिवार आहे. ते मनमिळ स्वभावाचे व धम्मकार्यात स्वतःला वाहून घेतले होते. सुप्ररिचित व्यक्तिमत्व होते. त्याच्या वर अंथरवन पिंपरी येथे अंत्यविधी शेतामधे करण्यात आला. यावेळी सर्व क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. त्यामध्ये वकील, डॉक्टर, इंजिनियर, प्राध्यापक, शिक्षक, विविध राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक संघटनेचे नेते यांनी श्रद्धांजली वाहिली. त्यांचा अंत्यविधी त्यांच्या शेतामध्येच पार पाडण्यात आला. वाघमारे परिवाराच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

# नवनियुक्त शिक्षकांना तात्काळ पदस्थापना द्यावी

## महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेची मागणी; शिक्षकांमध्ये नाराजी

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाने पवित्र पोर्टल द्वारे शिक्षकांची भरती प्रक्रिया राबवली व त्यानुसार बीड जिल्हा परिषदेला १९ शिक्षक मिळाले आहे. मात्र तीन महिन्याचा कालावधी होत आला तरीही अद्याप शिक्षण विभागाकडून पात्र उमेदवारांना नियुक्तीचे आदेश व शाळांवर पदस्थापना देण्यात आलेली नाहीत. परीक्षेत उत्तम गुण घेतल्यानंतरही जिल्हा परिषदेकडून नियुक्ती आदेश व पदस्थापना देण्यास विलंब होत असल्याने उमेदवारांनी नाराजी व्यक्त केली आहे. सदरील नवीन नियुक्ती शिक्षकांना समुपदेशनाने शाळांवर तात्काळ पदस्थापना देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकारी यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.




मागील अनेक वर्षापासून शिक्षक भरती झालेली नव्हती त्यामुळे राज्य शासनाने शिक्षक भरतीची प्रक्रिया राबवली असून बीड जिल्ह्यातून रिक्त जागांची माहिती संघर्ष केल्यानंतर पवित्र पोर्टल वर भरण्यात आली. त्यानुसार पहिल्या टप्प्यात उर्दू माध्यमाच्या १९ प्राथमिक पदवीधर शिक्षकांची निवड झाली. त्यानंतर कागदपत्रांची पडताळणीचे कामही पूर्ण झाले. यापुढे समुपदेशन घेऊन उमेदवारांना नियुक्ती आदेश देऊन शाळांवर पदस्थापना देणे अपेक्षित होते. मात्र, तीन महिने उलटूनही जिल्हा प्रशासनाकडून पदस्थापना संदर्भात कोणतेही हालचाली दिसून येत नाही. बीडचे शिक्षण विभाग याबाबत उदासीन दिसून येत आहे. त्यामुळे शिक्षकांमध्ये नाराजी व असंतोषाची भावना निर्माण होत आहे. राज्यात इतर जिल्हा परिषदांमध्ये पवित्र पोर्टल मार्फत भरतीनंतर पुढील नियोजन व वेळापत्रक जाहीर करण्यात आले व त्यानुसार समुपदेशन फेऱ्या झाल्या आहेत तसेच नियुक्तीपत्र देत उमेदवारांना शाळांवर रुजू करून घेण्यात आले आहे. मात्र बीड जिल्हा परिषदेच्या संथ कारभारामुळे बीडचे भावी शिक्षक अजूनही नियुक्ती आदेशाची प्रतीक्षा करत आहेत. अजूनही नवनियुक्ती शिक्षकांच्या पदस्थापना संदर्भात शिक्षण विभागाचे कोणतेही नियोजन किंवा वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले नाही. यामुळे उमेदवार जिल्हा परिषदला चकरा मारून वैतागले आहे. नवनियुक्त शिक्षकांना तात्काळ शाळांवर पदस्थापना देण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य उर्दू शिक्षक संघटनेचे वतीने करण्यात आली आहे. यावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजेद अहमद, जिल्हा उपाध्यक्ष सय्यद रिजवान, सचिव उमर चिशती व कोषाध्यक्ष सय्यद रहीम उपस्थित होते.

### बदल्या व समायोजन रखडल्याने उशीर?

शिक्षकांचे आंतरजिल्हा बदल्या तसेच अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन याची प्रक्रिया अजूनही प्रलंबित आहे याचा निपटारा केला नंतरच नवनियुक्त शिक्षकांना नियुक्ती देण्यात येईल तसेच टीईटी गैरव्यवहारांमधील उमेदवारांना त्यांचे चारित्र्य पडताळणी दाखला गुन्हे अन्वेषण शाखा सायबर, पुणे यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर समुपदेशन प्रक्रिया होऊन नियुक्ती दिली जाणार असल्याची माहिती समोर येत आहे.

## वफ्फ बोर्डाच्या कार्यालयासमोर घंटानाद आंदोलन करणार-वर्षा जगदाळे

बीड । प्रतिनिधी



अंबाजोगाई येथील संगीन मज्जिद इनाम जमिनी बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री करणाऱ्या विरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने करण्यात आलेली आहे. बीड व छत्रपती संभाजी नगर तसेच मुंबई येथील वफ्फ कार्यालयात पुरावे सहित तक्रार करूनही अधिकारी लक्ष देत नसल्याने बीड येथील वफ्फ कार्यालयासमोर महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने अधिकाऱ्यांची झोप उघडविण्यासाठी घंटानाद आंदोलन करणार असल्याचे महाराष्ट्र निर्माण सेनेच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे.

अंबाजोगाई येथील वफ्फ संस्था मज्जिद संगीन मौजे अंबाजोगाई यांची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र अनुक्रमांक एक पार्ट बी पान क्रमांक ६० व ६१ यामध्ये १९७४ पासून नोंद असून दर्गेचे सेवेसाठी एकूण१० सर्वे नंबर क्षेत्र २७६ एकर १८ गुंठे सेवेसाठी बहाल करण्यात आले होते. सदरील इनाम जमीन काही भूमाफियांनी संगणमत करत स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीर रित्या लाखो रुपयात खरेदी विक्री केलेली आहे. सदरील जमीन खरेदी विक्री प्रकरणी महाराष्ट्र निर्माण सेना मागील अनेक दिवसापासून पाठपुरावा करत आहे. या संदर्भात छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ कार्यालयात संबंधित खरेदी विक्रीचे सर्व कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहे .या गंभीर बाबीची दखल छत्रपती संभाजीनगर येथील वफ्फ अधिकारी घेत नसल्याने येत्या पंधरा दिवसात संबंधित प्रकरणात दोषी असणाऱ्या व्यक्ती विरोधात कायदेशीर कारवाई न झाल्यास महाराष्ट्र निर्माण सेनेच्या वतीने बीड येथील वफ्फ कार्यालया समोर महाराष्ट्र निर्माण सेना घंटानाद आंदोलन करणार असल्याचे निवेदनात महाराष्ट्र निर्माण सेनेच्या राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी म्हटले आहे.

## वृक्ष लागवड ही एक कृषीविश्वातील चळवळ व्हावी - डॉ. राऊत

आष्टी । प्रतिनिधी

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी संलग्नित श्री छत्रपती शाहू फुले आंबेडकर कृषी महाविद्याल आष्टी येथे ०५ जुन २०२४ रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा करण्यात आला. या प्रसंगी ''आपली जमीन आपले भविष्य'' या विषयावर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी शेतकरी, जमीन व झाडे यांचा असलेला संबंध विशद करून सांगितला. राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे स्वयंसेवक वृक्ष लागवड करतातच, परंतु या मोहिमेत प्रत्येकाचा वाटा असणे महत्वाचे आहे, यामध्ये लहानांपासून ते थोरांपर्यंत सर्वांनी वृक्ष लागवड करून त्यांचे जतन करून पृथ्वीवरील झाडांची संख्या वाढवण्यात हातभार लावला पाहिजे.**

वृक्ष संपदा ही अनन्यसाधारण व मानवाला मिळालेली मोठी देणगी आहे. परिणामी वृक्ष लागवड ही लोकचळवळ झाली पाहिजे कारण पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी, जमिनीची धूप थांबवण्यासाठी, पृथ्वीचा उष्णतेपासून रक्षण करण्यासाठी तसेच जागतिक तापमान वाढ रोखण्यासाठी आपल्याजवळ असलेला महत्त्वाचा मार्ग म्हणजे वृक्ष लागवड आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रशासन अधिकारी डॉ. डी. बी. राऊत यांनी उपस्थिती दर्शवली. त्यांनी वृक्ष लागवडीचे महत्त्व शेती करत असताना किती महत्त्वाचे आहे या विषयावर दृष्टिक्षेप टाकला. कृषी महाविद्यालयाचे प्रा. लक्ष्मण मिसाळ यांनी विद्यार्थ्यांनी त्यांचे भविष्य हे वृक्ष लागवडीमध्ये कसे दडलेले आहे, याबद्दल त्यांचे मत मांडले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त कृषी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत आष्टी शहरामधून रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. रॅलीची समाप्ती महाविद्यालय परिसरामध्ये वृक्ष लागवड करून करण्यात आली. या कार्यक्रमाच्या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक, महाविद्यालयाचे विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन राष्ट्रीय योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अशोक मस्के यांनी केले.

## सहाय्यक आयुक्त शिंदे यांनी पालकमंत्र्यांना अंधारात ठेवून नियमबाह्य १०७ घरकुलास घेतली मंजुरी

बीड । प्रतिनिधी

ततत्कालीन बीड जिल्ह्यातील समाज कल्याण सहाय्यक आयुक्त आर.एम.शिंदे यांच्या कार्यकाळात ग्रामीण भागातील रमाई घरकुल योजनेतील जिल्ह्याला उद्दिष्ट असलेले प्रस्ताव आचारसंहितेच्या अगोदर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन मंजूर करण्यात आले.परंतु बीड तालुक्यातील ग्रामीण उद्दिष्ट व्यतिरिक्त १०७ रमाई घरकुल योजनेची पालकमंत्री यांची दिशाभूल करून मंजुरी घेतली. पंचायत समिती बीड मार्फत मंजुरीसाठी कोणताही प्रस्ताव आलेला नसतानाही अंधारात ठेऊन दिशाभूल करून मंजुरी घेतली.

रमाई घरकुल योजनेचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत ग्रामसभेत मंजूर करून सदर प्रस्ताव पंचायत समितीला पाठवले जातात त्यानंतर पंचायत समिती त्या प्रस्तावाची छाननी करते. त्यानंतर हे प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी पंचायत समिती कडून समाज कल्याण सहाय्यक आयुक्त बीड पाठवले जातात. व जिल्ह्याचे पालकमंत्री या कमिटीचे अध्यक्ष असतात परंतु आर.एम. शिंदे व नितिन राठोड यांनी बीड पंचायत समिती मार्फत प्रस्ताव दाखल नसतानाही.स्वतःचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी बोगस लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी मिळवून दिली. मागासवर्गीय प्रवर्ग सोडून इतर लाभार्थी असण्याची शक्यता आहे. याबाबत बीड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी १५ मे २०२४ रोजी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड यांना पत्र लिहिले असून १०७ लाभार्थ्यांना कुठल्या कागदपत्राच्या आधारे अथवा या कार्यामार्फत विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करण्यात आलेले नसतानाही त्यांच्या नावे घरकुल मंजूर केलेले आहे. यामध्ये मोठा आर्थिक गौरव्याहार झाल्याची शक्यता दिसून येत आहे. सदरील लाभार्थ्यांचे प्रस्ताव ग्रामपंचायत मार्फत पंचायत समिती ला प्राप्त नव्हते. व या कार्यालया मार्फत आपल्याकडे प्रस्ताव सादर न करता थेट घरकुल लाभार्थ्यांना मंजुरी दिली आहे. त्यामुळे त्या लाभार्थ्यां संदर्भात पुढील कार्यवाही याबाबत वरिष्ठ पातळीवर पत्र व्यवहार केला आहे. याची प्रत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड व प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बीड यांना गट विकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी दिली आहे. अशाप्रकारे आर.एम.शिंदे यांनी त्यांच्या कार्यकाळात अनेक प्रकारच्या अनियमित्ता केल्या आहेत. या प्रकरणात त्यांची विभागीय चौकशी देखील चालू आहे.सदरील प्रकारात त्यांच्यावर योग्य ती कारवाई कधी होईल याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

### जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं.१६०/२०२४**

**बंडू पि.दगडू मातकर विरुद्ध ग्रामपंचायत कार्यालय, वरवटी ता. जि. बीड**

**पहा बंडू पि.दगडू मातकर रा. कृषी नगर कॅनॉल रोड बीड ता. जि. बीड**

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून **मयत गेना बापु मातकर** यांचा दिनांक १०/०५/१९१८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे. सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास वरवटी ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे वरवटी ता.जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १२/०६/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १२/०७/२०२४ ही आहे.**

मार्फत
**ॲड. मिलिंद उबाळे**

स्वाक्षरित
**तहसिलदार, बीड**

# आ.सुरेश धस यांच्या वेळोवेळीच्या पाठपुराव्याला अखेर यश

## अखेर आष्टी नगरपंचायत शहर विकास आराखडा मंजूर –नगराध्यक्ष जिया बेग



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी शहराचा २०१५ पासून प्रलंबित असलेला शहर विकास आराखडा अखेर आ.सुरेश धस यांच्या शासन दरबारी वेळोवेळीच्या पाठपुराव्याने मंजूर झाला आता शहराचे रुपडे बदलणार असून हा शहर विकास आराखडा मंजूर झाल्याने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस व आमदार सुरेश धस यांचे नगराध्यक्ष जिया बेग यांनी जाहीर आभार मानले आहेत. आष्टी नगरपंचायत कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पुढे बोलताना नगराध्यक्ष जिया बेग म्हणाले,आष्टी नगरपंचायत २०१५ साली नगरपंचायत अस्तित्वात आल्यानंतर आ.सुरेश धस यांच्या ताब्यात असलेली नगरपंचायतचा कायापालट झाला आहे.अखेर २०१५ पासून शहराचा विकास आराखडा हा प्रलंबित होता.या आराखड्याबाबत आ.सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन प्रथम नगराध्यक्ष नवाब खान यांनी या आराखड्याचे सर्वेक्षण केले होते ते आत्ता अखेर नऊ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर अत्यंत जिव्हाळ्याचा आणि अत्यावश्यक असलेला प्रलंबित प्रश्न विद्यमान नगराध्यक्ष जिया बेग यांच्या कार्यकाळात मंजूर झाला आहे.मागील महाविकास आघाडीच्या काळात या शहर विकास आराखडा मंजूर करण्यासाठी अनेक अडथळे आले होते.मात्र, आत्ता महायुती सरकारच्या काळात सरकारकडे सततच्या पाठपुराव्याने आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने हा शहराचा आराखडा मंजूर करून घेण्यात आला आहे. या आराखड्यामध्ये येणाऱ्या पुढील ३५ वर्षाच्या अनुषंगाने करण्यात येणारे विकास कामे व शहर विकासाला चालना मिळून प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहेत.यामध्ये बेघर कुटुंबांसाठी जागा आरक्षित करण्यात आली असून बेघरांना आता घरकुल मिळणार आहेत.तर बेरोजगार युवकांना शहरात ठिकठिकाणी कॉम्प्लेक्स होणार आहेत.यामध्ये शहरातील अनेक रस्ते पूर्ण तर काही रस्ते अपूर्ण राहिले आहेत त्यामध्ये अण्णाभाऊ साठे ते शनी मंदिर १५ मि.पूर्ण,शनी मंदिर ते कमान वेस १२ मि.पूर्ण,कमानवेश ते तलवार नदी ९ मि. पूर्ण,शनी मंदिर ते शेकापुर रस्ता १२ मि.अपूर्ण,आनंद ऋषी चौक ते संभाजी चौक १२ मि.पूर्ण, संभाजी चौक ते भाजी मार्केट ९ मि. पूर्ण, भाजी मार्केट ते मेहेर गल्ली ९ मि. पूर्ण,श्री भोज यांचे घर ते शेकापूर रोड ९ मि. पूर्ण, कमानवेस ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड १२ मि.पूर्ण,कमानवेस ते संभाजी चौक ९ मि. पूर्ण,पठाडे कॉम्प्लेक्स ते अनिल भैय्या निकाळजे चौक ९ मि. पूर्ण, द्वारके यांचे घर ते नगर बीड रोड १२ मि. अपूर्ण, सानप हॉस्पिटल ते बाजारतळ १२ मि.अपूर्ण, टिपू सुलतान चौक ते बुद्धविहार ९ मि.पूर्ण,याच बरोबर शहरात विविध ठिकाणी शॉपिंग कॉम्प्लेक्स ला मंजुरी मिळाली आहे.या शहर विकास आराखडाला मंजुरी दिल्याने राज्याचे मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,आ.सुरेश धस यांचे विशेष आभार नगराध्यक्ष जिया बेग यांनी मानले आहेत.

### आष्टी शहरात शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या माध्यमातून युवकांना मिळणार रोजगार–नगराध्यक्ष जिया बेग



आष्टी नगरपंचायत अंतर्गत लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नाने आष्टी शहराचा कायापालट होत आहे.त्यात विकास आराखड्याची भर पडल्याने अनेक प्रलंबित विकास कामे आता मार्गी लागणार असून यामध्ये युवकांच्या बेरोजगारीचा प्रश्न मार्गी लागणार आहे. आष्टी शहरात ठीकठिकाणी अद्यावत शॉपिंग कॉम्प्लेक्स तयार करण्यात येणार आहेत.यातून युवकांच्या हाती आता रोजगार मिळणार असल्याने मनस्वी आनंद होत असल्याचे नगराध्यक्ष जिया बेग यांनी यावेळी सांगितले.

# पोखरी रोडवर पाणीच पाणी



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहराच्या दक्षिणेला असलेल्या पोखरी रोडवर पाणीच पाणी झाले आहे . त्यामुळे वाहनचालकांची तारांबळ होत आहे.

पोखरी रोडच्या परिसरात चार शाळा आणि हजारो नवीन घरे झाली आहेत . सिल्वर सिटी , जिजाऊनगर व अनेक ठिकाणी नाल्या नसल्यामुळे रस्त्यावर पाणी साचले आहे . काही जणांच्या तळघरात पाणी साचले आहे . प्रशासन मात्र याकडे डोळेझाक करीत आहे.

योगेश्वरी नगरी, पोखरीरोड व वाघाळा रोड परिसरात नाल्याचे नियोजन नाही जोगाईवाडी ग्रामपंचायत निधी अभावी नाल्या बांधीत नाही . नवीन वसाहती जवळ अनेक गटारे झाली . आता पावसाळ्यात पाणी रस्त्यावर आणि घरात साचत आहे . बीड जिल्हा परिषद , सार्वजनिक बांधकाम विभाग, सरपंच, आमदार , खासदार , मुख्यमंत्र्यांपर्यंत नागरिकांनी निवेदने दिली . दहा वर्ष पाठपुरावा केला परंतु येथे नाल्या झाल्याच नाहीत . आता नागरिकांनी उपोषणाचा इशारा दिला आहे. पोखरी रस्त्यावर मोठी वर्दळ आहे . या रस्त्याची सुधारणा करावी आणि त्याबाजूला नाल्या बांधाव्यात अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

# शिक्षक नेते बबनराव पंडित यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा




**बीड । प्रतिनिधी**

बहुजन शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बबनराव पंडित यांना वाढदिवसा निमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसर बीड येथे वृक्षारोपण करून वाढदिवस साजरा.याप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये, बहुजन शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष विजयकुमार समुद्रे,आस संघटनेचे जिल्हाध्यक्ष करण राजपूत, उर्दू संघटनेचे शेख मणियार, महादेव विणकर, ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे, मायकल वाघमारे, उद्योजक मनोज काळे, शिक्षक भरतीचे उद्योग खरात,मकरंद मराडे, पंचायत समितीचे वंजारे साहेब ,बर्डे पंढरी,आप्पा काळे.आदी शुभेच्छा देताना उपस्थित होते.

# माजी मंत्री क्षीरसागरांच्या प्रयत्नामुळेच रुग्णालयाला जागा मिळाली – बाबुशेठ लोढा

**बीड । प्रतिनिधी**

चौसाळा या ठिकाणी भव्य ग्रामीण रुग्णालय व्हावे यासाठी गेल्या पाच वर्षापासून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे प्रयत्न सुरू आहेत. मध्यंतराच्या काळात रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होत नव्हती ही जागा गायरान जमीन म्हणून अतिक्रमित असताना न्याय प्रविष्ट देखील होती मात्र न्यायालयाने हे अतिक्रमण काढले त्याच वेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार्यां मार्फत पाठपुरावा करून रुग्णालयासाठी पाच एकर जागा उपलब्ध झाली असल्याची माहिती चौसाळा येथील बाबूसेठ लोढा दिली आहे.



चौसाळा ग्रामीण रुग्णालयासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा सातत्याने पाठपुरावा सुरू असून या रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होत नव्हती या ठिकाणी जवळपास १८ एकर गायरान जमिनीवर अतिक्रमण करण्यात आले होते. न्यायालयाच्या माध्यमातून हे अतिक्रमण हटवण्यात आले माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार्यांच्या मार्फत पाठपुरावा केल्यामुळे ग्रामीण रुग्णालयासाठी पाच एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली हा प्रस्ताव मंजुरीस्तव दाखल असून आरोग्य संचालक लातूर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. हे रुग्णालय झाल्यास चौसाळा आणि परिसरात अनेक गावाचा आरोग्याचा प्रश्न सुटणार आहे या ठिकाणी ग्रामीण रुग्णालय व्हावे यासाठी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सातत्याने प्रयत्न केला असून या कामाचे श्रेय इतर कोणीही लाटू नये असे सांगून चौसाळा येथील बाबूसेठ लोढा, नितीन लोढा, अंकुश कळासे, अच्युत मोरे, दत्ता नाईकवाडे, भारत चौधरी, कैलास येडे, दादासाहेब तेलप, दत्तात्रय जोगदंड, सतीश जोगदंड यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांचे आभार मानले आहेत.

# दोन दिवसात मनोज जरांगे यांच्या उपोषणाची दखल न घेतल्यास वडवणी तालुक्यात तीव्र आंदोलन : सकल मराठा समाज वडवणी

**वडवणी । प्रतिनिधी**

सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करुन मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे यासाठी मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे गेली ६ दिवस झाले कसल्याही प्रकारचे अन्न पाणी न घेता अंतरवली सराटी येथे उपोषणास बसले आहेत.त्यांच्या आंदोलनाची कसल्याही प्रकारे दखल न घेता सरकार हे बघ्याची भूमिका घेत आहे.जरांगे पाटील यांची तब्येत दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे.मराठा समाज पाटलांची हाल अपेष्टा कदापिही सहन करू शकत नाही.

येत्या दोन दिवसांमध्ये जरांगे पाटील यांच्या आंदोलनाची दखल न घेतल्यास सकल मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.



सविस्तर वृत्त असे की गेली दहा महिने झाले मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील हे गोरगरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी आंदोलन करत आहे.अंतरवली सराटी ते मुंबई पाई महामोर्चा काडला होता.या मोर्चाची धास्ती घेऊन मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सग्या सोयऱ्यांची अधिसूचना काढली पण त्याला पाच महिने उलटूनही त्याची अंमलबजावणी केली नाही.अंतरवली सराटी येथील व महाराष्ट्रातील विनाकारण कारण नसतांनाही मराठा आंदोलकांवर गुन्हे दाखल केले ते अद्यापही मागे घेतले नाहीत.सरकारने या समाजाच्या मागण्या तात्काळ मान्य कराव्यात यासाठी मराठा संघर्ष योद्धा

# अंबाजोगाईत ४५ कुटुंबांनी घेतली धम्मदीक्षा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपलं वर्तन हे बुद्धाचे वर्तन असले पाहिजे, बुद्ध होणे म्हणजे माणूस होणे होय. ही जात गुलामी मध्ये स्वतंत्र देत नाही ,हिंदू धर्मातील दोन जाती कधी एक होणार नाहीत आणि ही दरी मिटवायची असेल तर बुद्ध झाल्या शिवाय दरी मिटणार नाही असे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत सुकुमार कांबळे यांनी केले. ते बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई शहरातील मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात काल दि.११ जून रोजी सायंकाळी आयोजित बौद्ध धम्मदीक्षा सोहळ्यात बोलत होते.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी १९५४ मध्ये जागतिक परिषदेत बौद्ध होण्याची कारणे सांगितले आहेत. यामध्ये त्यांची नैतिक शिक्षण देणारा भारतामध्ये बंधुत्व




**आपलं वर्तन हे बुद्धाचे वर्तन असले पाहिजे, बुद्ध होणे म्हणजे माणूस होणे – जेष्ठ विचारवंत सुकुमार कांबळे**

**समता बंधुत्वता न्याय हे संविधानाने शिकवले – राजरत्न आंबेडकर**

एस्टॅब्लिश करणारा सोशल आणि मॉरल फिजिक्स पर आधारित असणारा बौद्ध धर्म भारतामध्ये बाबासाहेबांनी आणला ,आता देवी देवतांच्या मुर्त्या बाहेरून त्या ठिकाणी बुद्ध मूर्ती येत आहेत. समता बंधुत्वता न्याय हे संविधानाने शिकवले असल्याचे भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्न आंबेडकर म्हणाले ते उद्घाटक म्हणून बोलत होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रबोधिनी, सत्यशोधक समाज महासंघ , जीवन ज्योत शि.प्र.मंडळ अंबाजोगाई यांच्या वतीने भव्य धम्मदीक्षा सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात पु.भदंत डॉ.मैत्रीय घोष आयुपाल थेरो, धम्मदेसना देतील तर भन्ते पय्यानंद थेरो, भन्ते बुद्धशील (लातूर) यांनी ४५ मातंग आणि होलार समाजाच्या कुटुंबांना दीक्षा दिली तसेच यावेळी धर्मांतर केलेल्यांचा सत्कार करण्यात आला. या सोहळ्याचे उद्घाटक भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजरत्न आंबेडकर यांनी केले.

# वनविभागाने रानडुक्करांचा तत्काळ बंदोबस्त करा – राजेंद्र आमटे

**बीड । प्रतिनिधी**

वनविभागाच्या दुर्लक्षपणामुळे शेतकरी आणि शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे अशा परिस्थितीतही वन विभाग लक्ष देण्यास तयार नाही पिसाळलेल्या रानडुकराने शेतकऱ्यांवर हल्ला केला असून या रानडुक्करांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे सर आदींनी केली.

बीड तालुक्यातील खडकीघाट येथील शेतकरी गोवर्धन भोसले व भीमराव वाघ यांच्यावर अचानक पिसाळलेल्या रानडुक्कराने जीवघेणा हल्ला केला. शेतकरी हे लाईफ लाईन हॉस्पिटल मध्ये उपचार घेत आहेत. शेतकऱ्यांच्या तब्येतीची विचारपूस केली असता हे लक्षात आले




की हल्ला करणारे रानडुक्कर पिसाळलेले असून वन विभागाने कसल्याही प्रकारचा बंदोबस्त वन विभागाने केला नाही वन विभागाच्या भोगळ कारभारामुळे अनेक शेतकरी, जनावरांना हे डुक्कर चावा घेऊ शकते. अशा पिसाळलेल्या रान डुक्करानचा तत्काळ बंदोबस्त करावा तसेच तालुक्यातील अन्य ठिकाणी वन विभागाने रान डुक्कर व इतर वन्य प्राण्याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी रानडुक्कराच्या हल्ल्यात जखमी शेतकऱ्यांना भेटीच्या वेळी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सचिन जाधव, पंडित शेडगे, विशाल हावळे, रामदास वाघ, गौतम जोगदंड, सखाराम झनझाने सह आदींनी केली.

# माजलगावच्या जुना तहसिल भागातून गायीची चोरी

**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरातील जुना तहसिल रोड भागातील रहिवाशी युनुस गैबु शेख यांची गाय अज्ञात चोरट्यांनी चोरली असुन याप्रकरणी युनुस शेख यांनी शहर पोलिसांत तक्रार दिली आहे.



दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. ३१ मे च्या रात्री युनुस शेख यांच्या घरासमोरून अज्ञातांनी त्यांची गाय चोरून नेली असुन तिची शोधा – शोध केली परंतु गाय सापडली नाही. त्यामुळे युनुस शेख यांनी शहर पोलिसात गाय चोरीबाबत तक्रार दिली असुन तात्काळ गायीचा शोध घ्यावा अशी मागणी केली आहे. दरम्यान शहरामध्ये भुरट्या चोरांचा सुळसुळाट झाला असुन याकडे पोलिस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

माजलगाव शहरात जनावराच्या चोरीच्या अनेक घटना दररोज घडत असल्यामुळेच जनावराच्या मालकामधे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे गावामधे दिवस रात्र हे मोकाट जनावरे चोरून नेण्यात चोरटयाना सहज व सोपे जात आहे मात्र काल ही चोरलेली गाय ही वयालेली असुन तीचे वासरु घरीच आहे माझी गाय पोलीसांनी तात्काळ कारवाई करून शोधावी अशी मागणी युनुस शेख यांनी केली आहे.

# कुमशीतील शेतकरी करणार एस.आर.टी. तंत्रज्ञानावर पिकाची लागवड

**घाटसावळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या वतीने जिल्हा अधीक्षक बाबासाहेब जेजुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कुमशी गावातील शेतकरी शंभर एकर क्षेत्रावर पिकाची लागवड एस आर टी तंत्रज्ञानानुसार करणार आहेत याबाबत लागवड माहिती देण्यासाठी बीडचे तालुका कृषी अधिकारी बाळासाहेब गंडे मंडळ कृषी अधिकारी कृष्णा नागरगोजे यांनी येथे भेट देऊन यासाठी तंत्रज्ञानावर लागवडीची माहिती शेतकऱ्यांना दिली एस आर टी तंत्रज्ञान म्हणजे सगुना राईस टेक्नॉलॉजी हे तंत्र मालेगाव नेरळ जिल्हा रायगड येथील प्रगतशील शेतकरी चंद्रशेखर भडसावळे व त्यांची पत्नी अनुराधा भडसावळे हे एस आर टी तंत्रज्ञान आपल्या



शेतात राबवतात व त्याचा प्रसार करतात एस आर टी तंत्रज्ञान म्हणजे साडेचार फुटाचे गादीवाफे तयार करायचे व दीड फुटाची सरी तयार करून घ्यायची व या गादी वाफ्यावर तूर सोयाबीन ही पिके टोकन पद्धतीने लावायची व पुढे या वर्तनाचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून तन नाशक मारून घ्यावे व हे पीक काढून घेत असताना पीक कापून घ्यायचे व त्यांची मुळे गादीवाफ्यात तशीच ठेवायची व त्याच ठिकाणी ती बुजवायची यामुळे त्या गादीवाफ्यामध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण वाढेल गांडुळे तयार होतील असे हे सुपीक बेड दहा वर्ष तसेच ठेवायचे एक वेळी पीक काढल्यानंतर दुसऱ्या पिकाची लागवड करावी यालाच एस आर टी तंत्रज्ञान म्हणतात यामुळे शेती मशागतीचा

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार दि.१३ जून २०२४ । पान ७

# प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेचा लाभ घेण्याचे पारंपरिक बलुतेदार कारागिरांना आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग विभागाने पारंपरिक काम करणाऱ्या बलुतेदार कारागिरांसाठी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना सुरू केली असून जिल्ह्यातील बलुतेदार कारागिरांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामाद्योग कार्यालयाने केले आहे.

ग्रामीण व शहरी पारंपरिक बलुतेदार कारागिरांच्या उद्योगास स्थैर्य निर्माण करणे, त्यांना व्यवसायिक प्रशिक्षण देऊन आर्थिक मदत, नाममुद्रा प्रचार (ब्रँड प्रमोशन) आणि बाजारपेठ जोडणीसाठी (मार्केट लिंकेज) व्यासपीठ तयार करण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाच्या सुक्ष्म, लघू व मध्यम उद्योग मंत्रालयाने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत व्यवसाय सुरू करण्यासाठी पारंपरिक बलुतेदार कारागिरांना ५ टक्के व्याजदरात विना तारण ३ लाखापर्यंत दोन टप्प्यात कर्ज उपलब्ध करून दिले जाणार आहे.

प्रशिक्षण घेणाऱ्या कारागिरांना ५ दिवसीय मुलभूत प्रशिक्षण व १५ दिवसीय कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार असून प्रशिक्षण कालावधीत प्रति दिन ५०० रूपये विद्यावेतन दिले जाणार आहे. प्रशिक्षणानंतर प्रमाणपत्र तसेच ओळखपत्र प्रदान केले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या कारागिरांना टूलकिट खरेदीसाठी १५ हजार रूपयांच्या पावत्यादेखील (व्हावचर्स) देण्यात येणार आहे.

सुतार, लोहार, सोनार (दागिने कारागीर), कुंभार, न्हावी, माळी (फुल कारागीर), धोबी, मूर्तीकार, टोपल्या, झाडू, बांबुच्या वस्तू बनवणारे, शिंपी, गवंडी, चर्मकार, अस्त्रकार, बोट बांधणारे, अवजारे बनवणारे, खेळणी बनविणारे, कुलूप बनविणारे व विनकर कामगार आदी पारंपरिक कारागीर या योजनेत समाविष्ट केले आहेत.

सदरची योजना संपूर्ण ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत असून लाभार्थ्यांची नोंदणी आवश्यक आहे. लाभार्थ्यांची नोंदणी सुक्ष्म व लघू व मध्यम उद्योग विभागाचे संकेतस्थळ, सामान्य सुविधा केंद्र (सीएससी), सेंटरवर व आपले सरकार सेवा केंद्र येथे विनामूल्य करण्याची सुविधा करण्यात आली आहे. लाभार्थी नोंदणीकरिता आधार, पॅन कार्ड, जात प्रमाणपत्र, शिधापत्रिका, बँकेचे पासबुक, आधारकार्ड संलग्न मोबाईल क्रमांक आदी कागदपत्रांची आवश्यकता आहे.

लाभार्थींना मिळणारे लाभ थेट त्यांच्या खात्यात जमा होणार आहेत. योजना राबविण्यासाठी कोणतीही त्रयस्थ व्यक्ती किंवा मध्यस्थ संस्थेची नेमणूक करण्यात आलेली नाही. कोणत्याही मध्यस्थाच्या भूलथापांना किंवा अमिषाला लाभार्थ्यांनी बळी पडून त्याच्यासोबत आर्थिक व्यवहार करण्यात येऊ नयेत. या बाबतीत झटपट आर्थिक लाभाची आमिष दाखवून फसवणूक झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थ्यांची राहील.

अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, २४ ब, जुना पुणे मुंबई रस्ता, शासकीय दूध डेअरी समोर, पुणे-३ येथे किंवा ई-मेल पत्ता dviopunerediffmail.com वर संपर्क करावा, असेही जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सतीश खरात यांनी कळविले आहे.

# लग्नाच्या आमिषाने कोल्हापूरातील ३४ वर्षीय महिलेवर अत्याचार, लाखो रुपयेही लुटले

**पुणे । प्रतिनिधी**

कोल्हापूर येथील एका ३४ वर्षीय महिलेला लग्न करण्याचे आमिष दाखवून पुण्यातील एका व्यक्तीने तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर तिच्याजवळील सोन्याचे दागिने व ऑनलाइन अडीच लाख रुपये घेऊन फसवणूक केली. हा प्रकार स्वारगेट एस. टी. स्टँड परिसरात आणि शुक्रवार पेठेतील हॉटेलमध्ये २० फेब्रुवारी ते ८ मे २०२४ या कालावधीत घडला आहे.



या प्रकरणी पीडित महिलेने मंगळवारी (दि. ११) स्वारगेट पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरून विनायक रमेश जाधव (रा. पुणे, पूर्ण पत्ता माहीत नाही) याच्यावर बलात्कारासह अन्य कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला मूळची कोल्हापूर येथील आहे. आरोपी महिलेच्या ओळखीचा आहे. आरोपी विनायक जाधव याने पीडित महिलेला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. तिला विश्वासात घेऊन स्वारगेट एस. टी स्टँडवर बोलावून घेतले. त्याठिकाणी चारचाकी गाडी घ्यायची असून, त्यासाठी पैशांची गरज असल्याचे सांगितले. तसेच गाडी खरेदीसाठी महिलेकडून एक तोळे सोन्याचे दागिने घेतले.

त्यानंतर त्याच्या ओळखीच्या लोकांच्या बँक खात्यावर २ लाख ४७ हजार ५०० रुपये ट्रान्सफर करून घेतले.

तुझ्यासोबत आयुष्यभर सोबत राहणार असल्याचे सांगून लग्नाचे आमिष दाखवले. महिलेला शुक्रवार पेठेतील एका हॉटेलमध्ये नेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. त्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिलेने स्वारगेट पोलिसांकडे तक्रार दिली. या प्रकरणाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक अश्विनी बावचे या करत आहेत.

# लोकसभा निवडणूक संपताच शरद पवारांचा दुष्काळी दौरा; म्हणाले, नुसती शेती एके शेती

**पुणे । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूक संपताच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी दुष्काळी दौरा सुरु केल आहे. शरद पवारांनी बारामती आणि पुरंदर तालुक्यातील गावांना शरद पवार भेटी देत आहेत. पुरंदर तालुक्यातील वाल्हे, नीरा या गावांना भेटी दिल्यानंतर पवार पुरंदर तालुक्यातील कोळविहरे गावात पाहणी करत आहेत. शरद पवार यांनी यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधला. तेव्हा शेतीसोबतच जोडधंदा करण्याचा सल्ला शरद पवार यांनी दिला. नुसतं शेती एक शेती करून चालणार नाही. इतरही व्यवसाय करावे लागतील. एमआयडीसी तरूणांना रोजगार देते.एमआयडीसीला पर्याय नाही, असं शरद पवार म्हणाले.

पवारांचा शेतकऱ्यांशी संवाद

पुरंदर तालुक्यातील कोळविहरे गावात शरद पवार पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शेती आणि जोडधंदा यावर शरद पवारांनी स्थानिकांना मार्गदर्शन केलं. दीर्घ स्वरूपाच्या उपाययोजना काय करता येईल. संदर्भात माहिती घेण्यासाठी मी आलोय. राज्य सरकारकडे जाऊन मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन संयुक्त बैठक घेणार आहे. वातावरण बदलले आहे मात्र समाधानकारक नाही. निवडणूक झाली तुम्ही काही कमतरता पडू दिली नाही. पावसाची



कमतरता आहे मात्र मतांची पडू दिली नाही. मुख्यमंत्र्यांशी बैठक घेऊन हे प्रश्न कायमस्वरूपी कसे सोडवता येईल. याबाबत आग्रह धरू, असं शरद पवार म्हणाले.

जोडधंदा करण्याचा सल्ला

पुणे जिल्हा एकेकाळी शिक्षणाचे माहेरघर होते. पुण्याला कारखाना द्यायचा नाही. कारखाना द्यायचा असेल तर बाहेर द्यायचा असा निर्णय मी त्यावेळी घेतला होता. शेती एक शेती करून चालणार नाही. एमआयडीसीला पर्याय नाही. याबाबत राज्य सरकारशी उद्योग खात्याशी चर्चा करणार आहे. जिथे शक्य आहे तिथे एमआयडीसी आणणार आहे. देशात सरकार आलं. यावेळी आलेले सरकार दुसऱ्याची मदत घेऊन आलं आहे. हे सरकार फार दिवस राहील असं वाटत नाही. कालच्या निवडणुकीत जी मदत केली तीच मदत येणाऱ्या निवडणुकीत पण करा, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

स्थानिकांची पवारांपुढे कैफियत

पुरंदर तालुक्यातील दुष्काळी दौऱ्यात स्थानिकांनी शरद पवारांपुढे कैफियत मांडली. या भागात नेत्यांच्या जमिनी आहेत. विजय शिवतारे यांची ४५० एकर जमीन आहे. तर अशोक टेकवडे यांची ५०० एकर जमिनी आहेत. शेतकऱ्यांच्या जमिनीवर ताबा मारला असा आरोप स्थानिकांनी केला. यावर मार्ग काढण्याचं आवाहन स्थानिकांनी शरद पवारांना केलं. त्यावर नेत्यांचे गाव असल्याचा टोला शरद पवारांनी लगावला.

# पिंपरी चिंचवड ॲडव्होकेटस् असोशिएशनच्या वतीने नवनियुक्त न्यायाधीशांचे स्वागत

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी नेहरूनगर न्यायालयातील नवनियुक्त न्यायाधीश श्री.व्ही.एन.गायकवाड, श्री.ए.एम. बगे, श्रीमती.एम.ए.आवळे, श्री.बी.डी. चोखट, श्रीमती.टी.एस.महाडिक, श्री.एस.एन.गवळी, अल अमूदी ए.के. श्रीमती.एस.एस.चव्हाण यांचे स्वागत पिंपरी चिंचवड डव्होकेटस् असोशिएशनच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले यावेळी पिंपरी न्यायालयाचे न्यायाधीश एन.आर गजभिये (प्रमुख न्यायाधीश) व श्री.एम.जी.मोरे साहेब उपस्थित होते. या वेळी असोसिएशनच्या अध्यक्षा ड.प्रमिला हरीश गाडे यांनी उपस्थित वकील बंधू - भगिनींच्या वतीने नवनियुक्त न्यायाधीश साहेबांचे स्वागत करून मनोगत व्यक्त करण्यात आले.



स्वागत समारंभानंतर नवनियुक्त न्यायाधीश यांच्या वतीन न्यायालयाचे न्यायाधीश पिंपरी न्यायालयाचे प्रमुख न्यायाधीश एन.आर गजभिये व .एम.जी.मोरे साहेब यानी स्वागत समारंभाबद्दल उपस्थितांचे आभार मानून मनोगत व्यक्त केले. पुढे साहेब म्हणाले की, पिंपरी न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या ५ वरून १० झाली आहे. न्यायालयीन कामकाजाची विभागणी होऊन खटले लवकर निकाली निघण्यास मदत होणार आहे. त्याकरिता वकील बंधू आणि भगिनींनी आम्हाला सहकार्य करावे असे आवाहन करण्यात आले. या स्वागत समारंभाच्यावेळी माजी अध्यक्ष ड.नारायण रसाळ, ॲड.सुनील कडूसकर, ॲड.किरण पवार, माजी उपाध्यक्ष ॲड.प्रतिक जगताप, ॲड.पांडुरंग शिनगारे, ॲड.योगेश थांबा, ॲड.अरुण खरात(मामा), ॲड.बी.के कांबळे, ॲड.पूनम शर्मा, ॲड.संगीता कुशलकर, ॲड.पूनम राऊत, ॲड.सविता तोडकर ॲड.संतोष मोरे इ.वकील मान्यवर उपस्थित होते. या स्वागत समारंभाचे आयोजन पिंपरी चिंचवड डव्होकेट असोसिएशनच्या उपाध्यक्ष ॲड.गोरख कुंभार, महिला सचिव ॲड.वर्षा तिडके -कांबळे, खजिनदार ऐश्वर्या शिरसाठ, सदस्य ॲड.जयेश वाकचौरे, ॲड.साक्षी धुमाळ, ॲड.तेजश

# 'एमआयटी एडीटी'च्या प्रांजलीची सुवर्णकामगिरी!

**पुणे । प्रतिनिधी**

एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग पुणेच्या स्कुल ऑफ बायोइंजिनिअरिंगची विद्यार्थीनी प्रांजली विनोद सुरदुसे हिने जेजेटीयू विद्यापीठ झुंझनू, राजस्थान येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मिनी गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक पटकावित दैदिप्यमान कामगिरीची नोंद केली आहे.



प्रांजलीने महिला एकेरी स्पर्धेत स्ट्रोक प्रकाराच्या अंतिम फेरीत ४८ गुणांसह प्रथम क्रमांक पटकाविताना सोनेरी कामगिरी केली तर गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या खेळाडूने ५५ गुणांसह दुसरा क्रमांक पटाकाविला. या स्पर्धेत प्रांजलीला सुवर्णपदकासह सर्वोत्कृत महिला खेळाडू पुरस्काराने देखील गौरविण्यात आले. प्रांजली ही एमआयटी एडीटी विद्यापीठाची अत्यंत हरहुन्नरी खेळाडू असून तिने काही महिन्यांपूर्वीच ३७ व्या राष्ट्रीय मिनीगोल्फ स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधीत्व करताना रौप्य पदक देखील पटकाविले होते.

प्रांजलीच्या या सुवर्णकामगिरीबद्दल विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा कुलगुरू प्रा.डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालिका प्रा.डॉ.सुनीता कराड, प्र.कुलगुरू डॉ.अनंत चक्रदेव, डॉ.मोहित दुबे, डॉ.रामचंद्र पुजेरी, कुलसचिव डॉ.महेश चोपडे, क्रीडा विभागाचे संचालक व शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्रा.पद्माकर फड यांनी तिचे अभिनंदन केले आहे.


# अल्पवयीन आरोपीचा निरिक्षणगृहातला मुक्काम वाढणार; नवी अपडेट आली समोर

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात पोर्शे ही आलिशान कार भरधाव वेगात चालवून दोन तरुणांचा जीव घेतल्याच्या घटनेतील अल्पवयीन आरोपी बिल्डरपुत्राची बाल न्याय मंडळानं १३ दिवसांनी रिमांड वाढवली आहे. त्यानुसार, त्याला २५ जूनपर्यंत निरिक्षणगृहात ठेवण्यात येणार आहे. पुणे पोलिसांनी यासाठी अर्ज दाखल केला होता. त्यावर दोन्ही बाजूंचा युक्तिवाद झाल्यानंतर मंडळाच्या अध्यक्षा अक्षी जैन यांनी हा आदेश दिला.

पबमध्ये मद्यपान करून सुसाट महागडी मोटार चालवत दोघांच्या मृत्यूस जबाबदार ठरलेल्या अल्पवयीन मुलाला १२ जूनपर्यंत निरिक्षणगृहात पाठविण्याचा आदेश मंडळाने दिला आहे. ही मुदत संपत असल्याने पोलिसांनी मुलाला आणखी काही दिवस निरिक्षणगृहात ठेवण्यासाठीच्या हालचाली सुरू केल्या होत्या. त्यानुसार मुलाला आणखी १४ दिवस निरिक्षणगृहात ठेवण्यात यावे, असा अर्ज बुधवारी (ता. १२) दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे तपास अधिकारी असलेले सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे यांनी हा अर्ज केला आहे.

दरम्यान सुरुवातील मुलाला पाच जूनपर्यंत निरिक्षणगृहात ठेवण्याचा आदेश मंडळाने दिला होता. नंतर त्यात सात दिवसांची वाढ करण्यात आली होती. त्यामुळे अल्पवयीन मुलाचा निरिक्षणगृहातील मुक्काम १२



जूनपर्यंत वाढला होता. आता पुन्हा या मुदतीत २५ जूनपर्यंत वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांना दोनदा मुदतवाढ मिळाली आहे. अद्याप मुलाचे समुपदेशन सुरू आहे. तसेच व्यसनाधिनतेबाबत देखील त्याला समुपदेशन करण्यात येत आहे. सुधारगृहातून सुटका झाल्यास त्याच्या जीविताला धोका आहे, अशी माहिती मंडळातील सरकारी वकील आणि पोलिसांनी मंडळाला दिली दिली.

मुलाचे मानसिकदृष्ट्या आणि व्यसनाधिनतेच्या बाबतीत अद्याप समुपदेशन सुरू आहे. मुलाची निरिक्षणगृहातून सुटका झाल्यानंतर त्याचा ताबा कोणाकडे द्यायचा हे अद्याप निश्चित झालेले नाही. अपघाताच्या दिवशीचे व्हिडिओ व्हायरल झाले असून त्यातून मुलाची ओळख सार्वजनिक झाली आहे. त्यामुळे मुलाच्या जिवाला धोका आहे. तसेच मुलाच्या महाविद्यालयीन प्रवेशाबाबतचा युक्तिवाद बचाव पक्षाकडून करण्यात आला. मात्र मुलगा निरिक्षणगृहात असताना देखील त्याची प्रवेश प्रक्रीया होवू शकते, असे विशेष सहायक सरकारी वकील मोनाली काळे अध्यक्षांच्या निदर्शनात आणून दिले. मंडळात असलेल्या विविध तज्ज्ञांच्या माध्यमातून मुलाचे समुपदेशन सुरू आहे. मुलाला जामीन मिळाल्यानंतर या गुन्ह्याची व्याप्ती आणखी वाढली होती. या गुन्ह्यात आत्तापर्यंत सात जणांना अटक करण्यात आली असून तपास सुरू आहे. मुलाच्या सुरक्षेच्या कारणास्तव त्याचा बालसुधारगृहात मुक्काम वाढविणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलाचा निरिक्षणगृहातील मुक्काम १४ दिवस वाढविण्यासाठी अर्ज करण्यात आला होता, अशी माहिती सहायक पोलिस आयुक्त सुनील तांबे यांनी दिली. अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी मुलाला प्रौढ ठरवत त्यावर खटला चालवायचा असेल तर या गुन्ह्यात पोलिसांना मुलाला बाल न्याय मंडळात हजर केल्यापासून ३० दिवसांत पोलिस तपासाचा अहवाल (दोषारोपपत्र) दाखल करावे लागणार आहे. बाल न्याय (काळजी आणि संरक्षण) कायद्यात त्याबाबत नमूद करण्यात आले आहे. त्यानुसार पोलिस तयारी करत असल्याचे त्यांनी मंडळात दाखल केलेल्या अर्जात नमूद आहे. मात्र पोलिसांनी आता अहवाल सादर करण्यासाठी १४ दिवसांची मुदतवाढ मिळावी, अशी मागणी पोलिसांनी केली आहे. त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही.

# साहेब इंदापूरचा आमदार बदला, त्याशिवाय प्रश्न सुटणार नाहीत; शेतकऱ्याच्या शरद पवारांसमोर घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

साहेब तुम्ही इंदापूरचा आमदार बदला, त्याशिवाय आमचे प्रश्न सुटणार नाहीत. इंदापूरात आप्पासाहेब म्हणतील तसंच होणार, अशा घोषणा शेतकऱ्यांनी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यासमोर दिल्या आहेत. शरद पवारांनी आज इंदापूर तालुक्यातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. शेतकऱ्यांचे प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी शरद पवार म्हणाले, ४-६ महिने थांबा. मला राज्य सरकार बदलायचे आहे. त्यानंतर शेतकरी म्हणाले की, इंदापूरचा आमदार बदला. त्याशिवाय आमचे प्रश्न सुटणार नाहीत.

दोन एकरचा भाग मंजूर आहे आणि सहा एकरचे पाणी घेतो, हे थांबले पाहिजे

शरद पवार म्हणाले, माझ्याकडे १० वर्ष देशाच्या शेतीचे काम होते, त्यावेळी



कर्जमाफी केली. शेतीमालाचे भाव वाढवून दिले. सत्तेचा वापर लोकांसाठी करायचे असतो. नियमित पाणी आहे, ते मिळायला पाहिजे. माझा दोन एकरचा भाग मंजूर आहे आणि सहा एकरचे पाणी घेतो, हा उद्योग थांबल्याशिवाय तुम्हाला न्याय मिळणार नाही. माझ्या डोक्यात असं आहे की, हा तुमचाच प्रश्न आहे असं नाही. आम्ही जाईल तिथे लोक म्हणतात दुधाच्या भावासंबंधी राज्य सरकारपुढे म्हणणे मांडावे लागेल, असे आश्वासही शरद पवारांनी दिले.

४-६ महिन्यात राज्य सरकार बदलायचे आहे : शरद पवार

शेतकऱ्यांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले, पाणी- चाऱ्या बाबत आता काही करू शकत नाही. मुंबईत गेल्यानंतर सरकारमधील लोकांशी याबाबत भाष्य करेन. चार महिन्यांनी निवडणुका येतील,आमचा प्रयत्न आहे की काहीही करून सरकार बदलायच आहे. तोवर काही करू शकत नाही. येथील जमीन करायला नरेंद्र मोदी येणार नाहीत. काहीही होऊद्या जमीन करायची. पाणी प्रश्न सोडवा, अशी मागणी आपण करुयात.

सरकार बदलल्याशिवाय आपल्याला पाहिजेत ते निर्णय घेता येत नाहीत

आजच्या घडीला संसार चालवायला, दुधाचा धंदा हा एकमेव धंदा आहे. जेणेकरुन प्रपंच चालतो. सरकार बदलल्याशिवाय आपल्याला पाहिजेत ते निर्णय घेता येत नाहीत. माझ्याकडे १० वर्ष देशाच्या शेतीचे काम होते, त्यावेळी कर्जमाफी केली. शेतीमालाचे भाव वाढवून दिले. सत्तेचा वापर लोकांसाठी करायचे असतो. आज ज्यांच्याकडे सत्ता आहे, त्यांनी मी विनंती करतो, असंही शरद पवारांनी सांगितले.

# खादी आयोग निधी व कन्सोर्टियम बँक फायनान्स योजनांतर्गत थकीत कर्जास दंडव्याज माफ

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या खादी आयोग निधी व कन्सोर्टियम बँक फायनान्स या दोन्ही योजनांच्या थकीत कर्जास मंडळाने खादी आयोगाच्या परिपत्रकानुसार दंडव्याज माफी जाहीर केली आहे.

जिल्ह्यात या योजनेचे १ हजार १८५ थकीत कर्जदार असून या कर्जदारांनी मंडळाच्या जिल्हा कार्यालयाकडे थकीत रकमेचा एकरकमी भरणा केल्यास सबंधितांना दंडव्याज माफी लागू होणार आहे. थकीत कर्जदारांनी या दंडव्याज माफीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी सतीश खरात यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांनी विषमुक्त भाजीपाला उत्पादन करावे

**नारायणगाव प्रतिनिधी**

भारतीय कृषी अनुसंधान परिषद व कृषी विद्यापीठे यांनी संशोधित केलेल्या कीड व रोगासाठी प्रतिकारक असणाऱ्या भाजीपाला पिकातील सुधारित व संकरित जातींच्या वाणाची लागवड करून उत्पादन वाढविणे शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. आपल्या भागाला अनुकूल असलेल्या भाजीपाला जातींची निवड करून शेतकऱ्यांनी विषमुक्त भाजीपाला उत्पादन करावे. या साठी रासायनिक कीटकनाशके, खते यांचा मर्यादित वापर करावा, असे आवाहन भाकृअनुप-राष्ट्रीय कृषी अनुसंधान प्रबंध अकादमी (नार्म) हैद्राबादचे संचालक डॉ.सी.एच. श्रीनिवास राव यांनी केले.

ग्रामोन्नती मंडळ संचलित कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव, 'नार्म' हैद्राबाद यांच्या वतीने तीन दिवसीय विषमुक्त भाजीपाला लागवड तंत्रज्ञान प्रशिक्षण कार्यशाळेचे नारायणगाव येथील केव्हीकेमध्ये नुकतेच आयोजन केले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी 'नार्म'चे संचालक डॉ. सी.एच. श्रीनिवास राव, केव्हीकेचे अध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर यांच्या हस्ते झाले. तीन दिवसीय प्रशिक्षणात भरत टेमकर, डॉ. दत्तात्रेय गावडे यांनी एकात्मिक कीड-रोग व्यवस्थापन, विषमुक्त भाजीपाला उत्पादन या विषयावर, तालुका कृषी अधिकारी गणेश भोसले यांनी भाजीपाला पिकातील काढणीपश्चात तंत्रज्ञान या विषयावर, निवेदिता शेटे यांनी माती परीक्षणाचे महत्त्व व जैविक खतांचा वापर, डॉ.योगेश यादव यांनी भाजीपाला पिकाचे विपणन व विक्री या विषयावर मार्गदर्शन केले. वेळी ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पाटे, केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. प्रशांत शेटे, 'नार्म'चे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. एम. बालकृष्णन, शास्त्रज्ञ व कार्यक्रम संचालक डॉ. मुडे रमेश नाईक, पीक संरक्षण शास्त्रज्ञ डॉ. दत्तात्रेय गावडे, उद्यानविद्या शास्त्रज्ञ भरत टेमकर, कृषी विस्तार शास्त्रज्ञ राहुल घाडगे, मृदाशास्त्र शास्त्रज्ञ योगेश यादव, गृहविज्ञान शास्त्रज्ञ निवेदिता शेटे यांच्यासह भाजीपाला उत्पादक शेतकरी उपस्थित होते. राहुल घाडगे यांनी सूत्रसंचालन केले. आपल्या आहारात हंगामानुसार फळे व भाजीपाल्याचा समावेश असतो. फळे व भाजीपाला विषमुक्त असावे, असे आपल्याला वाटते. परंतु विषमुक्त उत्पादनाच्या दृष्टीने शेतकरी वर्ग दुर्लक्ष करत असतात. कार्यशाळेतील प्रशिक्षणातून मिळालेल्या माहितीद्वारे विषमुक्त भाजीपाला उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी प्राधान्य द्यावे. 'केव्हीके'कडून आवश्यक ते मार्गदर्शन आपल्याला केले जाईल.